| लातूर | वर्ष ३४ वे | अंक ३०४ वा | शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64


# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## कोलकाताला भूकंपाचे हादरे

### ५.२ रिश्टर स्केलची तीव्रता, लोक घाबरून घराबाहेर पडले...

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे शुक्रवारी सकाळी भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.६ इतकी होती. त्याचा केंद्रबिंदू शेजारच्या बांगलादेशातील तुंगी येथे होता. भूकंपाचा हादरा बसल्याने घाबरून लोक घराबाहेर पडले. सकाळी १० वाजून १० मिनिटांनी हा भूकंप जाणवला. हा भूकंप बांगलादेशातील तुंगीपासून पूर्वेकडे २७ किलोमीटर अंतरावर होता. त्याची खोली १० किलोमीटर असल्याचे वृत्त आहे. हा भूकंप कोलकाता आसपासच्या जिल्ह्यांमध्ये आणि उत्तर बंगालमध्ये जाणवला. कूचबिहार आणि दिनाजपूरमध्येही जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले.



भूकंपाची तीव्रता जोरदार असली तरी राज्यात कुठेही नुकसान झाल्याचे वृत्त नाही. भूकंपाच्या वेळी रस्त्यावर, प्रवासासाठी निघालेले किंवा प्रवासात असलेल्या लोकांना हा भूकंप जाणवला नाही. पण घरातील पंखे हलले आणि काही अंशी जमीन थरथरत होती. घाबरून बाहेर पडणारे लोक काही वेळाने पुन्हा आपल्या घरी परतले. त्यामुळे आता जनजीवन सामान्य आहे.

**आज पहाटे पाकिस्तानात भूकंप**

यापूर्वी, आज पहाटे पाकिस्तानमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले होते. पहाटे ३ वाजून ०९ मिनिटांनी झालेल्या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.२ इतकी होती. भूकंपाचे केंद्र पाकिस्तानमध्ये सुमारे १३५ किलोमीटर खोलवर होते. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या मते, गुरुवार-शुक्रवार रात्री हिंदी महासागरातही भूकंप झाला, ज्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.३ होती. अफगाणिस्तानातही भूकंपाचे धक्के जाणवले, भूकंपाचे केंद्र पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १९० किलोमीटर खोल होते. त्याची तीव्रता ४.२ इतकी मोजण्यात आली. टेक्टोनिक प्लेट्सच्या टक्करमुळे निर्माण होणारी ऊर्जा बाहेर पडण्याचा मार्ग शोधत असल्यानेच पृथ्वीवर भूकंप जाणवतात, असे जाणकारांचे मत आहे.

## दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणातून अरविंद केजरीवाल निर्दोष सुटका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** दिल्लीतील कथित मद्य घोटाळा प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची राऊज एव्हेन्यू न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. यामुळे केजरीवाल आणि सिसोदिया यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सत्याचा विजय झाला आहे, केजरीवाल, सिसोदिया भ्रष्टाचारी नाहीत, इमानदार आहेत, अशा शब्दात केजरीवाल यांनी निकालाचे स्वागत केले. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले.

**निकालानंतर अरविंद केजरीवाल काय म्हणाले?**



सत्याचा विजय झाला. नरेंद्र मोदी आणि अमित शहांनी सर्वात मोठा राजकीय कट रचला, आम आदमी पक्षाच्या पाच मोठ्या नेत्यांना तुरुंगात टाकले. भारतातच्या इतिहासात पहिल्यांदाच मुख्यमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीला तुरुंगात ठेवण्यात आले. सिसोदियांना दोन वर्षे तुरुंगात ठेवले. केजरीवाल भ्रष्टाचारी आहेत असा आरोप करण्यात, पण मी भ्रष्टाचारी नाही, असे म्हणताना केजरीवालांना अश्रू अनावर झाले.

**खोटी केस केली – केजरीवाल**

केजरीवाल भ्रष्ट आहेत म्हणत आमच्यावर टीका करण्यात आली. पण, केजरीवाल भ्रष्टाचारी नाही. सिसोदिया भ्रष्टाचारी नाही. माझ्यावर खोटी केस करण्यात आली. सत्तेसाठी देश आणि संविधानासोबत असा व्यवहार करु नका. खोटे गुन्हे दाखल करण्यापेक्षा चांगली कामं करुन सत्तेत या, असे केजरीवाल माध्यमांशी बोलताना म्हणाले.

**प्रकरणातील सर्व २३ जणांची सुटका**

दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणातील सर्व २३ आरोपींना न्यायालयाने दोषमुक्त केले. यात कुलदीप सिंग, नरेंद्र सिंग, विजय नायर, अभिषेक बोईनपल्ली, अरुण पिल्लई, मुथा गौतम, समीर महेंद्रू, मनीष सिसोदिया, अमनदीप सिंग धल्ल, अर्जुन पांडे, बुच्चीबाबू गोरंटला, राजेश जोशी, दामोदर प्रसाद शर्मा, प्रिन्स कुमार, अरविंद कुमार सिंग, चरणप्रीत सिंग, के. कविता, अरविंद केजरीवाल, दुर्गेश पाठक, अमित अरोरा, विनोद चौहान, आशिष चंद माथूर आणि सरथ रेड्डी

**न्यायालयाने सीबीआयला फटकारले**

तपासातील त्रुटींवरुन न्यायालयाने सीबीआयला कठोर शब्दांत फटकारले. मोठ्या आरोपपत्रात अनेक त्रुटी आहेत शिवाय साक्षीदार किंवा सबळ विधानाने आरोप सिद्ध केले नाहीत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. सीबीआय सिसोदिया यांच्याविरुद्ध प्रथमदर्शनी खटला तयार करण्यात अपयशी ठरली, असेही न्यायालयाने म्हटले. तर, कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय केजरीवाल यांना गोवण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले.

**नक्की प्रकरण काय?**

२०२२ मध्ये दिल्ली मद्य धोरणात गैरप्रकार झाल्याचा आरोप तत्कालिन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्याविरोधात करण्यात आला होता. १०० कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला होता. सीबीआयकडून याबाबत विविध पुरवणी आरोपपत्रही दाखल केली होती. अरविंद केजरीवाल यांच्यासह २३ जणांची नावे आरोपपत्रात नमूद करण्यात आली होती.

## सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजनेसाठी १० मार्चपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने सन २०२५-२६ साठी सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सरू केलेली आहे. प्रति जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

महसुली विभाग शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ४३ हजार रुपये, जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ३८ हजार रुपये व तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक सलग्न असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. या योजनेतर्गत अर्ज करण्याकरीता विद्यार्थी वसतिगृह प्रवेशास पात्र असावा. विद्यार्थी महाराष्ट्रचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र,तसेच जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहराच्या तथा तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील विद्यार्थी स्थानिक रहिवाशी नसावा. विद्यार्थी बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. तसेच विद्यार्थ्याने इयत्ता बारावीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इतर मागास वर्ग विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले आधार योजना व धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजनेतंर्गत १० मार्च, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने या संकेतस्थळावर https://hmas.mahait.org अर्ज भरावे. अधिक माहितीसाठी निरीक्षक भगवान केंद्रे (मो. न. ९५६११०९०१८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार
www.latursamachar.com

**प्रभात किरणे**

जगावे, जगवावे,शुभ चिंतीत जावे
काय करावे,करू नये,विचार करावे
काय बोलावे,बोलू नेय,मंथन करावे
होईल दुःख कोणास ,तैसे न वागावे
– इंजि. नागनाथ कलवले, लातूर

## शनिवारी महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे महा विधी सेवा शिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता रुक्मिणी मंगल कार्यालय, लक्ष्मीप्रयाग बँक्वेट, पोदार इंटरनॅशनल स्कूलसमोर, औसा-बार्शी रिंग रोड, लातूर येथे होणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील लाभार्थी, शालेय विद्यार्थी, नागरिक, तसेच जिल्हा प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.जे. भारुका, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे व्यंकटेश गिरवलकर यांनी केले आहे.



या शिबिराचा मुख्य उद्देश शासकीय कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे, या योजनांची योग्य अंमलबजावणी करणे, पात्र लाभार्थ्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे आणि कायदेशीर समस्या सोडवणे असा आहे. शिबिराद्वारे समाजातील विविध घटकांमध्ये कल्याणकारी कायद्यांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि शासकीय योजनांमध्ये त्यांची सहभागिता वाढवणे यावर भर देण्यात येणार आहे. शिबिरात विविध शासकीय विभागांचे सुमारे ५० स्टॉल्स उभारण्यात येणार असून, यामाध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ दिले जाणार आहेत.

या शिबिरात श्रमिक व मजूर, दिव्यांग व्यक्तींसाठी योजना, बालकांशी निगडित मुद्दे, ट्रान्सजेंडर, कारागृहातील कैदीं, अनुसूचित जाती व जमातींसाठी विशेष योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी लाभ, भिकारी व बेघर व्यक्तींसाठी मदत, रस्ता सुरक्षा व अपघात, नैसर्गिक आपत्तीचे पीडित, तस्करीचे पीडित आदीबाबत मार्गदर्शन केले जाईल.

लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर जिल्हा प्रशासन यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविला जाणार आहे. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.जे. भारुका, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आहे. या महाशिबिराला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर आणि न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ वाटप करण्यात येणार आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे २ मार्च रोजी

**लातूर/प्रतिनिधी :**प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार मार्च महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन २ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात होणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील उच्च विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लातूर येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलींचे व मुलांचे १०० विद्यार्थी क्षमतेचे प्रत्येकी एक वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. या वसतिगृहात विद्यार्थ्यांची भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य याची निःशुल्क व्यवस्था करण्यात येते. सन २०२५-२६ साठी रिक्त असलेल्या जागेवर वसतिगृह प्रवेशासाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर १० मार्च, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वसतिगृहात प्रवेशासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, तसेच जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहराच्या तथा तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील विद्यार्थी स्थानिक रहिवाशी नसावा. विद्यार्थी बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. तसेच विद्यार्थ्यांने इयत्ता बारावीमध्ये ६० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत.

वरील अटींची पूर्तता करत असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल श्रीमती वृषाली बडे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२६११८३) यांचेशी संपर्क करावा किंवा लातूर येथील मुलांचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल तिरुके सुरज (भ्रमणध्वनी क्र. ८३२९४४७४१०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ यांनी केलेले आहे.

**कुजबुज**

-डॉ. संजय जमदाडे



अकरा वर्षात महाराष्ट्राची अर्धव्यवस्था तिपटीने वाढविली - सीएम

**चिमटा दयाचा**



कोयता गँग, कुत्र्याचा उच्छाद, वाढती ट्रॅफीक! रस्त्यावर दुकाने हीच का लातूरचा ओळख ??

## सामाजिक न्याय विभागाच्या योजना गाव-खेड्यातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचवा - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

### सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. या योजनांचा लाभ गाव खेड्यांतील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचवावा, अशा सूचना केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज येथे दिल्या. लातूर शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.



जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, समाज कल्याण सहायक आयुक्त यादवराव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौध्द घटकातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी त्यांना करिअरविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे. तसेच त्यांना स्वतःचा उद्योग, व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण द्यावे. या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे केंद्रीय राज्यमंत्री श्री. आठवले म्हणाले.

सर्वांसाठी घरे उपक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. पात्र नागरिकांना कच्च्या घराच्या जागेवर पक्के घर बांधून देण्यासाठी झोपडपट्टी परिसरात मोहीम राबवावी. लातूर शहरातील विलासनगर, कॉईल नगर भागात सुमारे ३० वर्षांपासून राहत असलेल्या कुटुंबांना पक्के घर देण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी महानगरपालिकेने आराखडा तयार करण्याच्या सूचना केंद्रीय राज्यमंत्री श्री. आठवले यांनी दिल्या. यावेळी त्यांनी शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा, शासन सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गातील रिक्त पदे, आंतरजातीय विवाह, वृद्धापकाळ पेन्शन योजना, मुद्रा योजनेचाही त्यांनी यावेळी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मीना, मनपा आयुक्त श्रीमती मानसी, समाज कल्याण सहायक आयुक्त श्री. गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. नाईकवाडी यांनी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत माहिती दिली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वाढत्या प्रदूषणामुळे जीवन जगणे आवघड

प्रदूषण वाढल्सास किती घातक आहे याचा विचार गंभीरतेने केला जात नाही. वेळ निघून गेल्यास मात्र डोक्याला हात लावून बसण्याची वेळ येते. त्यापुर्वीच काळजी घेतली तर जीव तरी वाचविला जातो. या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. नुकतेच एक भयाण सत्य समोर आले आहे ते म्हणजे मुंबईत प्रदूषणामुळे कॅन्सर होत असल्याचे महाराष्ट्र सरकारने मान्य केले आहे. महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंगळवारी विधानसभेत सांगितले की, आरोग्य विभागाने राबवलेल्या कॅन्सर स्क्रीनिंग मोहिमेत राज्यात १,६७७ रुग्ण आढळले. यामध्ये असे दिसून आले की, वायू प्रदूषण फुफ्फुसाच्या कॅन्सरच्या प्रकरणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. फुफ्फुसाचा कॅन्सर हा एकूण कॅन्सर प्रकरणांच्या सुमारे ५७% आहे. तोंड, गर्भाशय आणि स्तनाचा कॅन्सर असलेले रुग्णही आढळले. दुसरीकडे, देशाची राजधानी दिल्लीतही कॅन्सर रजिस्ट्रीची आकडेवारी वेगाने वाढणाऱ्या प्रकरणांची साक्ष देत आहे. मात्र, केंद्र सरकारची भूमिका यापेक्षा वेगळी आहे. देशात अशी कोणतीही निर्णायक राष्ट्रीय आकडेवारी नाही, जी वायू प्रदूषण हे थेट मृत्यू किंवा कॅन्सरसारख्या आजाराचे एकमेव कारण असल्याचे सिद्ध करेल, असे सरकारने संसदेत स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईतील वाढते वायू प्रदूषण, बांधकामांच्या ठिकाणचे धुळीचे लोट रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचा आधार घेणार आहोत. मुंबईत बांधकामांवर देखरेख ठेवण्यासाठी इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित 'डायनामिक मॉनिटरिंग' व्यवस्था कार्यान्वित करण्याचे आदेश मनपाला देण्यात आले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेची कॅन्सर संस्था आयएआरसीने बाहेरील वायू प्रदूषणाला ग्रुप-१ कार्सिनोजेन म्हणजेच कॅन्सर निर्माण करणारा सर्वात मुख्य घटक घोषित केले आहे. लॅन्सेट मेडिकल जर्नलच्या अहवालानुसार, पीएम २.५चे सूक्ष्म कण फुफ्फुसाच्या खोलीपर्यंत जाऊन पेशींच्या डीएनएचे नुकसान करतात. ज्यामुळे ट्यूमरचा धोका वाढतो. संशोधनानुसार धूम्रपान न करणाऱ्यांच्या फुफ्फुसाच्या कॅन्सरचे एक मोठे कारण दूषित हवेत असलेले सूक्ष्म विषारी कणच आढळले आहेत. दिल्लीत राष्ट्रीय कॅन्सर रजिस्ट्री प्रोग्रामनुसार २०२३ ते २०२५ दरम्यान महिलांत फुफ्फुसाच्या कॅन्सरच्या प्रकरणांमध्ये १३.६% ची वाढ झाली आहे. पुरुषांमध्ये फुफ्फुसाच्या कॅन्सरची प्रकरणे ८.८% वाढली आहेत. दिल्लीची वार्षिक पीएम २.५ पातळी डब्ल्यूएचओच्या मानकांपेक्षा २० पटीपर्यंत जास्त. एका दशकापासून दिल्ली जगातील सर्वात प्रदूषित राजधानींपैकी एक आहे. यामुळे श्वसन, हृदयविकाराचा स्पष्ट धोका आहे. मुंबईत गेल्या दहा वर्षांपासून पीएम २.५/पीएम १० ची पातळी राष्ट्रीय मानकांपेक्षा सतत वर राहिली. गेल्या पाच वर्षांत पीएम १० ची सरासरी पातळी राष्ट्रीय मर्यादेपेक्षा जास्त राहिली आहे आणि पीएम २.५ ची पातळीदेखील डब्ल्यूएचओच्या मानकापेक्षा सुमारे सातपट जास्त आहे. म्हणजेच सुमारे एका दशकात मुंबईची हवा सतत प्रदूषित राहिली असून आरोग्याचा धोका कायम आहे. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव राज्यसभेत म्हणाले की, वायू प्रदूषण हेच मृत्यू किंवा कॅन्सरचे एकमेव प्रत्यक्ष कारण आहे, हे सिद्ध करणारा कोणताही अधिकृत डेटा भारतात उपलब्ध नाही. प्रदूषण किती घातक आहे हे सर्वांना माहिती आहे. तरी गांर्भीयाने विचार केला जात नाही. यामागील कारणांचा शोध घेतला जात नाही. वाढते प्रदुषण मग कोणत्याही मार्गाने असो ते जीव सृष्टिस घातक ठरू शकते. विविध मार्गाने प्रदूर्षन वाढत आहे. लोकसंख्या वाढली की, प्रदूषणाची समस्या वाढली हे गणित आहे. जनता गांर्भीयाने घेत नाही. यामुळे धुर्धर रोगाशी मुकाबला करावा लागतो. कर्करोगाची वाढती संख्या चिंताजनक आहे. एकतर पैसा अफाट मोजावा लागतो. एक रुग्ण आला तर आपली मोठी कमाई झाली अशी उपचार करणाऱ्याची मनस्थिती बनली आहे. ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे वाढत्या पदूषणावर उपाय आहे. ईश्वराने प्रत्येक बाबीचा मार्ग अगोदरच शोधला आहे. प्रत्येक बाबीचा मार्ग आहे हे लक्षात घेतले पाहिजे. एक तर वाढते प्रदूषण रोखू शकत नाही. कायद्याने ते शक्य होईलच असे नाही. काही प्रमाणात यश मिळू शकेल. प्रत्येकाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. ती मानसिकता म्हणजे प्रत्येकांनी प्राचीन संस्कृतीकडे वळावे लागेल. यज्ञ म्हणजे हवन करावे लागेल. यात वैदिक पद्धतीने सांगितलेल्या वस्तू तुपासह यज्ञ करावा लागेल. एकमेव यज्ञ, हवन हा उपाय आहे. याला शासकिय मान्यता मिळाली पाहिजे. यात जे विज्ञान, शास्त्र लपले आहे हे सर्वांना सांगावे लागेल. भोपाळ मध्ये ज्यावेळी वायू प्रदूषण झाले. अनेकांना आपले डोळै गमवावे लागले त्यावेळीचा एक रिपोर्ट जाहिर झाला तो वाचण्यात आला. त्यात म्हटले होते की, ज्या घरात यज्ञ, हवन होत होते त्या घरातील व्यक्तींला विजा झाली नाही. त्यांना डोळे गमवावे लागले नाहीत. प्रदूषणावर यज्ञ,हवन हा उपया विज्ञानाने सांगितला आहे. या बाबत सर्च केले तर कळणार आहे. हे एक कर्मकांड नाही तर एक विज्ञान आहे. हे विसरून चालणार नाही. त्यामुळे आपल्याला निरोगी जीवन जगावयाचे झाले तर सत्य जाणून घेवून त्यानुसार वाटचाल करावी लागेल. वरचेवर प्रदूषणात वाढ होणार आहे. विविध मार्गाने प्रदूषणाचे आक्रमण होणार आहे. यज्ञ, हवन सोडले तर दुसरा पर्याय करणे आवघड आहे. आता शुद्ध आहारसाठी रासायनिक मुक्त अन्न तयार करणे अशक्य आहे. कोणीही युरिया शिवाय शेती करीत नाही. कोणीही फळास इंजेक्शन दिल्याशिवाय मार्केटमध्ये फळे आणत नाही. भोपळा, टोमाटो आदि केमिकलचा वापर करून बाजारात आणला जातो ही वस्तूस्थिती आहे. शुद्ध हवासाठी डोंगर किंवा हिमालयात जाणे शक्य नाही. राणात जावून राहाणे शक्य नाही. सध्याला शुद्ध हवेचा अभाव आहे. वाढते तापमान चिंतेचा विषय आहे. मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होत आहे. झाडाची अमाप जोडीमुळे प्रदूषाचे संकट वाढत आहे. त्यामुळे विचार करून आतापासून घरोघरी यज्ञ, हवन सुरू करावे. यात विज्ञान दडलेले आहे. हे निरोगी जीवनाचे सुत्र आहे. यावर अभ्यास करावा. प्रदूषण हे मोठे संकट आहे. याची चाहूल लागली आहे. ते आताच रोखले पाहिजे. आगामी काळात ते नियंत्रणात आणणे कठिण काम आहे. त्यामुळे वेळीच विचार करावा व निरोगी जीवनासाठी यज्ञ, हवनाच्या साह्याने जगावे.

# गुरु तेगबहादूर जी : सहिष्णुता, करुणा आणि धर्मस्वातंत्र्याचे प्रतीक

भारतीय इतिहासात अशी काही महान व्यक्तिमत्त्वे उदयास आली आहेत की, ज्यांचे जीवन समाजासाठी प्रेरणादाई व मार्गदर्शक ठरते अशा महान विभूतींचे कार्य एखाद्या धर्माच्या चौकटीत न अडकता संपूर्ण मानवजातीसाठी अखंड प्रेरणेचा स्रोत ठरले आहे. शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर जी, हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सत्य, न्याय, करुणा, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अर्पण केले. त्यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत असताना, त्यांचे सामाजिक सुधारक म्हणून असलेले कार्य आणि विचार आजही तितकेच सुसंगत आणि मार्गदर्शक आहेत. प्रत्यक्षात शीख धर्म असा एक धर्म आहे की या धर्माच्या धर्म गुरुनी दिलेल्या बलिदाना मुळे हिंदू धर्माचे रक्षण झाले आहे.

गुरु तेगबहादूर जी : थोडक्यात जीवनपरिचय

१ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे जन्मलेले गुरु तेगबहादूर जी हे सहावे शीख गुरु श्री गुरु हरगोबिंद साहेब यांचे ते तेजस्वी पुत्र होते. बालपणापासूनच त्यांच्या जीवनावर अध्यात्म, शौर्य आणि सेवाभावाचे संस्कार कोरले गेले. वेद-उपनिषदे, इस्लामी तसेच भारतीय तत्त्वज्ञानाच्या सखोल चिंतनातून त्यांच्या विचारांना सर्वधर्मसमभाव आणि उदात्त मानवतावादाची दिव्य झळाळी प्राप्त झाली. गुरु तेगबहादूर जी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते एक प्रभावी सामाजिक सुधारक होते. त्या काळात भारतीय समाज जातीय भेदभाव, धार्मिक अत्याचार, अंधश्रद्धा आणि राजकीय दडपशाहीने ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत त्यांनी समाजाला सत्य, समानता आणि नैतिकतेचा मार्ग दाखवला.

धर्मस्वातंत्र्याचा पुरस्कार

भारतीय इतिहासात मुघल सम्राट औरंगजेब आणि शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर जी, ही दोन व्यक्तिमत्त्वे परस्परविरोधी विचारधारांचे प्रतीक म्हणून समोर येतात. एकीकडे सत्ता, कट्टरता आणि धर्मांतराची सक्ती यांचे प्रतिनिधित्व करणारा औरंगजेब, तर दुसरीकडे धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि सत्यासाठी प्राणांची आहुती देणारे गुरु तेगबहादूर जीया संघर्षातून भारतीय समाजाला नैतिक मूल्यांची नवी दिशा मिळाली.

औरंगजेब (इ.स. १६५८१७०७) हा मुघल साम्राज्याचा सहावा सम्राट होता. तो अत्यंत कुशल प्रशासक आणि पराक्रमी सेनानी असला, तरी त्याची ओळख प्रामुख्याने धार्मिक असहिष्णुता आणि जबरदस्तीच्या धर्मांतर धोरणांमुळे होते. त्याने जिझिया कर पुन्हा लागू केला, अनेक हिंदू मंदिरे पाडली आणि इस्लाम स्वीकारण्यासाठी दबाव टाकला.

त्याच्या कारकिर्दीत विशेषतः काश्मीरमधील हिंदू पंडितांवर अमानुष अत्याचार झाले. धर्मांतर न स्वीकारल्यास कारावास, छळ आणि मृत्यू अशी भीतीदायक परिस्थिती निर्माण करण्यात आली. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे होते. काश्मीरमधील पीडित पंडितांनी जेव्हा मदतीसाठी गुरु तेगबहादूर जी यांच्याकडे धाव घेतली, तेव्हा त्यांनी हा प्रश्न केवळ एका समाजाचा न मानता संपूर्ण मानवतेचा प्रश्न म्हणून स्वीकारला. त्यांच्या दृष्टीने धर्म बदलणे ही अंतःकरणाची बाब होती; ती तलवारीच्या धाकाने लादता येत नव्हती. गुरु तेगबहादूर जी यांनी औरंगजेबाच्या अन्यायी धोरणांना उघड आव्हान दिले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्मस्वातंत्र्यावर गदा आणणे हे अधर्माचे लक्षण आहे. औरंगजेबाने गुरुजींना इस्लाम स्वीकारण्याचा आदेश दिला; परंतु गुरु तेगबहादूर जी यांनी तो ठामपणे नाकारला. या नकारामागे हट्ट नव्हता, तर तत्त्वनिष्ठा होती. जर गुरुजी नी स्वतः धर्मांतर स्वीकारले असते, तर लाखो लोकांकडून या अन्यायाला मौनसंमती मिळाली असती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देण्याचा मार्ग स्वीकारला. गुरु तेगबहादूर जी यांचे हे सर्वात महान सामाजिक योगदान होय याला धर्मस्वातंत्र्याचे रक्षक असे ही संबोधता येईल . गुरुजी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर मानवी स्वातंत्र्याचे सजग प्रहरी होते. त्यांनी सर्वधर्मसमभाव, समता आणि आत्मसन्मान या मूल्यांचा पुरस्कार केला.

त्यांच्या धर्मांतरास उघड विरोधा नंतर इ.स. १६७५ साली दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेगबहादूर जी यांना अमानुष यातना देऊन त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. हे बलिदान कोणत्याही राजकीय सत्तेविरुद्ध नव्हते, तर विचारस्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले महान बलिदान होते. गुरुजींचे बलिदान झाल्या नंतर औरंगजेबाची सत्ता जरी तात्पुरती टिकली, तरी इतिहासाच्या न्यायालयात तो दडपशाहीचा प्रतीक ठरला; तर गुरु तेगबहादूर जी मानवतेचे अमर नायक बनले. म्हणूनच त्यांना ''हिंद की चादर'' असे गौरवाने संबोधले जाते.

गुरुजींनी केवळ शीख धर्मियांसाठी नव्हे, तर हिंदू धर्मीयांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान देण्याचा निर्णय घेतला. ''जर गुरु तेगबहादूर धर्म स्वीकारतील, तर सगळे काश्मिरी पंडित इस्लाम स्वीकारतील'' असे औरंगजेबाला सांगण्याचा धैर्यपूर्ण निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय म्हणजे धार्मिक सहिष्णुतेसाठी दिलेले सर्वोच्च बलिदान होते. त्यांच्या या धाडसी व समाज वाचवण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाने समाज एकत्र होण्यास बळ मिळाले. धर्मस्वातंत्र्य, मानवी सन्मान आणि सामाजिक न्यायासाठी दिलेले हे ऐतिहासिक बलिदान होते. त्यांच्या या बलिदानामुळे भारताच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासाला नवी दिशा मिळाली. त्यांचे पुत्र श्री गुरु गोबिंदसिंग जी यांनी पुढे खालसा पंथाची स्थापना करून अन्यायाविरुद्ध संघटित लढ्याचा मार्ग दाखवला.

**मानवाधिकारांचे आद्य पुरस्कर्ते**

आज आपण मानवाधिकारांची चर्चा करतो, पण गुरु तेगबहादूर जी यांनी १७व्या शतकातच मानवी हक्कांचा पुरस्कार केला. धर्म मानण्याचा अधिकार, विचार करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार हे मूलभूत मानवी हक्क आहेत, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. त्यांचे बलिदान हे कोणत्याही एका धर्मासाठी नसून संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठी होते.

**जातीय भेदभावाविरुद्ध संघर्ष**

त्या काळातील भारतीय समाज जातिभेदाच्या खोल दरीत अडकलेला होता. जन्मावर आधारित उच्च-नीचतेच्या कठोर रेषांनी माणसामाणसांत भिंती उभ्या केल्या होत्या. सामाजिक प्रतिष्ठा, धार्मिक अधिकार आणि मानवी सन्मान हे काही मोजक्या वर्गांपुरते सीमित झाले होते. अस्पृश्यता, भेदभाव आणि अन्याय हे समाजजीवनाचे अंग बनले होते. अशा विषम आणि अन्यायी सामाजिक रचनेत मानवी समानतेचा विचार मांडणे हे क्रांतिकारक धैर्याचे लक्षण होते.

याच अंधाऱ्या काळात गुरु तेगबहादूर जी यांनी शीख परंपरेतील ''एक ओंकार'' या तत्त्वाचा आशय समाजजीवनात उतरवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने ईश्वर एकच असून, त्याची निर्मिती असलेला प्रत्येक मानव समान आहे. जात, धर्म, वर्ण किंवा पंथ यांवर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेला त्यांनी स्पष्टपणे नकार दिला. त्यांच्या बाणीतून माणसाच्या अंतःकरणातील शुद्धता, आचरणातील नैतिकता आणि सेवाभावाचे महत्त्व अधोरेखित होते. सामाजिक समतेचा हा संदेश केवळ उपदेशापुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष आचरणातून व्यक्त झाला गुरु तेगबहादूर जी यांनी जातिभेदाच्या जखमांवर करुणेचा लेप लावला आणि समाजाला समतेच्या दिशेने नेण्याचा मार्ग दाखवला. म्हणूनच त्यांचे कार्य केवळ धार्मिक नव्हते, तर मूलगामी सामाजिक सुधारणा घडवणारे होते. त्यांच्या विचारांनी पुढील पिढ्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली.

अंधश्रद्धा आणि कर्मकांडाला विरोध

गुरु तेगबहादूर जी यांच्या बाणीत आत्मचिंतनाला विशेष महत्त्व आहे. मनुष्याने प्रथम स्वतःच्या अंतःकरणाचा शोध घ्यावा, इच्छांचे बंधन ओळखावे आणि विवेकाच्या प्रकाशात जीवन जगावे, असा त्यांचा आग्रह होता. वैराग्य म्हणजे संसारापासून पलायन नव्हे, तर संसारात राहूनही आसक्तीवर विजय मिळवणे, हे त्यांनी स्पष्ट केले. संयम, सहनशीलता आणि धैर्य ही खरी साधना असून, संकटांच्या काळातही मन स्थिर ठेवणारा मनुष्यच खरा भक्त आहे, असा त्यांचा संदेश आहे. त्यांच्या मते ईश्वरभक्ती ही केवळ शब्दांत, वेशात किंवा विधींमध्ये व्यक्त होत नाही; ती माणसाच्या आचरणात, व्यवहारात आणि सेवाभावात प्रतिबिंबित झाली पाहिजे. म्हणूनच गुरु तेगबहादूर जी यांची बाणी ही आत्मशुद्धीची आणि मानवी मूल्यांची अमूल्य देणगी ठरते. त्यांनी अंधश्रद्धा, ढोंगीपणा आणि निरर्थक कर्मकांडांवर कठोर टीका केली. त्यांच्या बाणीत आत्मचिंतन, वैराग्य, संयम आणि ईश्वरभक्तीवर भर दिला आहे.

ते म्हणतात

**''तीर्थ फिरौ, अरु दान करौ, अवरु न पूजा जाई।**
**अंतर की मलु न उतरै, ज्यों धोवै घरु बाहि।।''**

त्यांचे म्हणणे होते की, खरी भक्ती ही माणसाच्या आचरणात दिसली पाहिजे, केवळ बाह्य आडंबरात नव्हे.

**''काहे रे बन खोजन जाई।**
सरब निवासि सदा अलिपतो, तोही संगि समाई।।''

गुरु तेगबहादूर जी यांनी सत्य, करुणा, दया, संयम आणि निर्भयता या नैतिक मूल्यांचा समाजात प्रसार केला. त्यांनी सांगितले की, संकटाच्या काळातही जो मनुष्य विचलित होत नाही, तोच खरा ज्ञानी आहे. त्यांच्या बाणीतून मानसिक स्थैर्य आणि आत्मबळ यांचा संदेश मिळतो. आजचा समाजही विविध प्रकारच्या सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक संघर्षातून जात आहे. अशा वेळी गुरु तेगबहादूर जी यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. धार्मिक सहिष्णुता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि मानवतेचा सन्मान हे मूल्य आजही तितकेच आवश्यक आहेत. गुरु तेगबहादूर जी हे केवळ शीख धर्माचे गुरु नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीचे मार्गदर्शक होते. त्यांच्या ३५० व्या बलिदान दिनानिमित्त आपण त्यांच्या सामाजिक सुधारणा, मानवतावादी विचार आणि निर्भय बलिदानाचे स्मरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण समाजात न्याय, समता आणि सहिष्णुता प्रस्थापित करण्यासाठी कार्य केले पाहिजे.गुरु तेगबहादूर जी यांचे बलिदान हे इतिहासातील एक तेजस्वी दीपस्तंभ आहे, जो आजही मानवतेचा मार्ग उजळवत आहे.

**-प्रो. डॉ. दीपक मो. शिंदे**
परीक्षा नियंत्रक, केंद्रीय जन जाती विद्यापीठ,
विजयानगरम (विशाखापट्टणम )
माजी संचालक श्री गुरु गोबिंद सिंघ जी
अध्यासन संकुल व संशोधन केंद्र, स्वामी
रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

# 'माझा मराठाचि बोलु कौतुकें'

वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन महाराष्ट्रात 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि आत्मगौरवाचा आहे. ''माझा मराठाचि बोलु कौतुकें'' या संतवचनाच्या प्रेरणेने मराठी भाषेच्या ऐतिहासिक परंपरेचा, साहित्यिक वैभवाचा आणि अभिजात स्वरूपाचा सुसंगत आढावा मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर...!!

मराठी भाषेची मुळे प्राचीन महाराष्ट्री प्राकृतमध्ये आढळतात. सातवाहन कालखंडात प्रतिष्ठान नगरी म्हणजेच आजचे पैठण हे राजकीय व सांस्कृतिक केंद्र होते. त्या काळात महाराष्ट्री प्राकृत ही लोकव्यवहार, प्रशासन आणि साहित्यनिर्मितीची प्रभावी भाषा होती. सातवाहन राजा राजा हाल यांनी संकलित केलेली गाथा सप्तशती ही काव्यरचना या भाषिक परंपरेचा भक्कम पुरावा मानली जाते. सुमारे २७८ कवींच्या आर्या या ग्रंथात समाविष्ट असून, इ.स.पूर्व दुसरे शतक ते इ.स. दुसरे शतक या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक आणि भावविश्वाचे प्रतिबिंब त्यातून दिसते. प्रेम, निसर्ग, ग्रामजीवन आणि स्त्री-पुरुष संबंधांचे सूक्ष्म दर्शन घडवणारी ही रचना मराठीच्या भावविश्वाची आद्य पायाभरणी ठरते.

महाराष्ट्री प्राकृत ते अपभ्रंश आणि पुढे प्राचीन मराठी असा भाषिक विकासक्रम दिसतो. शिलालेख, ताम्रपट आणि दानपत्रांतून मराठीच्या आरंभीच्या स्वरूपाचे पुरावे मिळतात. यादवकालीन प्रशासनात मराठीचा वापर वाढला. याच काळात मराठीला लोकभाषेचे बळ लाभले आणि ती ज्ञानप्रसाराचे प्रभावी माध्यम बनली.

संतपरंपरेत संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला तात्त्विक अधिष्ठान दिले. 'भावार्थदीपिका' अर्थात ज्ञानेश्वरी आणि 'अमृतानुभव' या ग्रंथांमधून त्यांनी संस्कृतातील तत्त्वज्ञान लोकभाषेत आणले. ''माझा मराठाचि बोलु कौतुकें, परि अमृतातेहि पैजा जिंके'' या त्यांच्या वचनातून मराठीच्या अभिव्यक्तीशक्तीवरील अढळ विश्वास प्रकट होतो. त्यानंतर संत नामदेव महाराज , संत एकनाथ महाराज , संत तुकाराम महाराज यांच्यासह वारकरी संप्रदायातील सर्व संत परंपरेमुळे अभंग-ओव्यांतून मराठीची अध्यात्मिक व सामाजिक परंपरा अधिक व्यापक झाली. भक्ती चळवळीने मराठीला लोकमान्यता, लोकसंवाद आणि लोकशक्तीचे माध्यम बनवले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात मराठी ही केवळ लोकभाषा न ठेवता ती राज्यकारभाराची भाषा बनवली. त्यातूनच राजव्यवहार कोष, पत्रव्यवहार, आज्ञापत्रे यांमधून मराठीची प्रशासकीय ताकद अधोरेखित झाली. स्वराज्य स्थापनेच्या प्रक्रियेत मराठीने स्वाभिमानाचे रूप धारण केले. पुढे पेशवेकाळात आणि नंतरच्या काळात शिक्षणव्यवस्थेत मराठीला नवीन आव्हाने आणि संधी लाभल्या. मुद्रणयंत्राच्या आगमनाने वृत्तपत्रे, ग्रंथप्रकाशन आणि आधुनिक साहित्यप्रकार विकसित झाले.

आधुनिक काळात कादंबरी, नाटक, कविता, ललितलेखन, समीक्षा, पत्रकारिता या सर्व क्षेत्रांत मराठीने स्वतंत्र ओळख निर्माण केली.

वि. वा. शिरवाडकर यांनी ''परभाषेच्या कचेरीत आपली भाषा साहेबासारखी वागवा, पण आपल्या घरात ती आईसारखी जपली पाहिजे,'' असे सांगत भाषिक स्वाभिमानाची जाणीव करून दिली. साने गुरुजी यांनी मातृभाषेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत तिचे ऋण मान्य करण्याचा संदेश दिला. या विचारांतून मराठी ही केवळ व्यवहाराची नव्हे तर संस्कारांची भाषा आहे, हे स्पष्ट होते.

अलीकडे केंद्र सरकार कडून मराठी भाषेला प्रदान करण्यात आलेला 'अभिजात भाषा' दर्जा हा तिच्या प्राचीन परंपरेचा आणि समृद्ध साहित्यसंपदेचा अधिकृत सन्मान आहे. दोन हजार वर्षांहून अधिक प्राचीन परंपरा, स्वतंत्र साहित्यनिर्मिती, शास्त्रीय ग्रंथसंपदा आणि सततचा भाषिक विकास या सर्व निकषांवर मराठी समर्थपणे उभी आहे. या मान्यतेमुळे संशोधन, शोधनिबंध, विद्यापीठीय अभ्यासक्रम आणि प्राचीन हस्तलिखितांचे जतन यांना नवे बळ मिळणार आहे.

आजच्या डिजिटल युगात मराठीसमोर नवी आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय भाषा प्रक्रिया, ई-ग्रंथालये, सामाजिक माध्यमे या सर्व क्षेत्रांत मराठीची उपस्थिती वाढवणे गरजेचे आहे. प्रशासन, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योगव्यवहार आणि उच्च शिक्षण यांमध्ये मराठीचा सशक्त वापर होणे ही काळाची गरज आहे, त्या दृष्टीने शासनही प्रयत्नशील आहे . तरुण पिढीत वाचनसंस्कृती, लेखनसंवेदना आणि भाषिक अभिमान रुजवणे ही आपली सर्वांची सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

मराठी भाषा गौरव दिन हा केवळ औपचारिक उत्सव नसून सांस्कृतिक स्व-ओळखीचा उत्सव आहे. मराठी ही महाराष्ट्राच्या अस्मितेचा आधारस्तंभ आहे; तिच्या शब्दांत इतिहासाचा ठसा, संतवाङ्मयाची करुणा, स्वराज्याचा स्वाभिमान आणि आधुनिकतेची झेप सामावलेली आहे.

''माझा मराठाचि बोलु कौतुकें'' ही भावना केवळ उच्चारात न राहता कृतीत उतरावी, मराठीचा वापर वाढावा, तिचे संशोधन-संवर्धन व्हावे आणि ती जागतिक पातळीवर अभिमानाने उभी राहावी...हीच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अपेक्षा व्यक्त करू या....!!

**-युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

# मायबोलीत बोलू या!
# चला मराठीतच बोलू या!!

मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढवलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे. मातृभाषा आपले अस्तित्व असते. बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे.

हा दिवस प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा आहे.

मराठी भाषा गौरव दिन : २७ फेब्रुवारी

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

२१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली. तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. तर दरवर्षी दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, वाचन उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा**

महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे...तुम्हाला माहिती आहे, श्री. चक्रधर स्वामींनी ही गोष्ट आठशे वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.

वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.

जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे.

उदाहरणार्थ, वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' मध्ये वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे.तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो.आचार्य प्र.के.अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात, तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदाहरणार्थ, कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे, तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहेस्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास

उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढवणे ही काळाची गरज आहे. शासन प्रयत्नशील आहेच; परंतु सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही, तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या!**

'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असतेविशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली.

महाराष्ट्रात येणारा कोणतीही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवते आणि सोबत घेऊन जाते. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे.

त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकवण्यासाठी आम्ही सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी..

**मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार**
**मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे**
**आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे**
**दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर**

ही अत्यावश्यक पावले आहेत.

दिवंगत कवीवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे

**मराठीची प्रतिभा, ज्ञानेश्वरीत सामावते**
**ग्रामगीता गाथाही, मराठीतच मावते**
**लावणीतून मराठीचे, सौंदर्य ओसंडते**
**शौर्य आणि औदार्य, पोवाड्यातून सांडते**
**मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले**
**गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले**
**अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली**
**आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची खोली**
**साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे**
**मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..!**

चला मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!


**- प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती), विमाका/कोल्हापूर**

# (गुरु वचन): सर्वांप्रती समान भाव असावा



एक स्वामी शारीरिक प्रकृतीने खूपच कमजोर होते. परंतु दररोज गंगास्नानाशिवायही इतरही काम ते करायचे. नदीच्या काठावर त्यांना खूप अडचण येत असे यासाठी स्नानाच्यावेळी ते ब्राह्मणाची मदत घेत होते व नंतर परतताना कोणत्याही जातीच्या व्यक्तीच्या खांद्यावर हाथ ठेऊन वरती येत होते. स्वामींच्या या वागणुकीला तेथील साधू-संत चांगले मानत नव्हते. व त्यांनाही काही म्हणू शकत नव्हते. एकावेळी एका शिष्याने स्वामीजीला विचारले की, आपल्या गंगा स्नानाचा काय फायदा, आपण स्नान करण्यासाठी ब्राह्मण लोकांची मदत घेतात आणि परतताना इतर कोणत्याही जातीच्या व्यक्तीची. यामुळे तर स्नान केल्यानंतरही अपवित्र होते. स्वामीजी शिष्याला म्हणाले, वत्सा हा तुझा भ्रम आहे. स्नानामुळे तर केवळ माझ्या शरीराचा वरील मळ साफ होतो. शरीरातील मळ तर तसाच राहतो आणि तो मळ त्या व्यक्तीसोबत येण्याजाण्याने साफ होतो. ज्याला तू कनिष्ठ जातीचा समजतोस. स्वामीजींचे हे म्हणणे ऐकून शिष्य म्हणाला, मला काही समजले नाही. तेव्हा स्वामीजी म्हणाले, वत्सा मी मानवामानवात अंतर समजत नाही. माझ्यासाठी सर्व जाती-संप्रदाय समान आहेत. मी त्या कनिष्ठ जातींच्या लोकांना जवळ करुन संदेश देऊ इच्छित आहे आणि असे केल्यामुळे मन शुद्ध होते. दुसऱ्यापेक्षा आपण मोठे असल्याचा भाव मनात अहंकार निर्माण करतो आणि हा अहंकार मनुष्याच्या प्रगतीचा सर्वात मोठा अडथळा आहे. तोपर्यंत मनाचा अहंकार नष्ट होत नाही. तोपर्यंत मनुष्य कधीही शुद्ध होऊ शकत नाही. कोणी लहान-मोठे नसते तर केवळ मनाचा भाव आपल्याला लहान-मोठा बनवतो आणि लहान-मोठा भेदभाव नष्ट करणे हा माझा उद्देश आहे. स्वामीजीचे हे वचन ऐकून शिष्य त्यांच्या मार्गाने चालू लागला.

# उपदेशकथा: जिभेचं बंधन व्यवहारबुद्धी



एका राजाच्या पदरी एक हुशार माळी होता. त्याचं उद्यान मोठं सुंदर असे. राजानं उद्यानात येण्याची इच्छा व्यक्त केली आणि काहीतरी वेगळं, नवलाचं पहायला मिळेल का असं माळ्याला विचारलं. माळ्यानं होकार दिला पण थोडी मधाची मागणी केली. दोन-चार दिवसानं राजाची उद्यान भेट ठरली. या दोन दिवसात माळ्यानं गव-ताला मध फासून मधोमध टाकलं होतं आणि थोड्या अंतरावरही विखरून टाकलं होतं. एरव्ही माणसाच्या वाऱ्यालाही न उभा राहणारा वातमृग त्या गवताच्या मधाच्या गोडीनं राजवाड्यातून उद्यानात आला होता. आणि शांतपणे गवत खात होता. माळ्यानं हे आश्चर्य राजाला दाखवलं. राजा म्हणाला, माणसासमोर कधीही न येणारा मृग केवळ रसतृष्णेनं आला. जिभेचं बंधन मोठं खरे!कथा उपदेश : जिभेचं बंधन मोठं बळकट.



# एक असे फळ आहे जे प्रथिनांनी समृद्ध आहे

चांगले आरोग्य राखण्यासाठी प्रथिने आवश्यक आहे. तसेच शरीरातील प्रत्येक पेशीसाठी प्रथिने आवश्यक आहे. ते स्नायूंना राखण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यास मदत करते. शरीराला एंजाइम आणि हार्मोन्स तयार करण्यासाठी देखील प्रथिनांची आवश्यकता असते. तर, कोणते फळ सर्वात जास्त प्रथिने प्रदान करते ते आज आपण पाहणार आहोत. तुम्ही तुमच्या आहारात हे फळ देखील समाविष्ट करू शकता.

कोणते फळ सर्वात जास्त प्रथिने प्रदान करते?

हे फळ हिरवे किंवा पिवळे रंगाचे दिसते आणि आतून पांढरे किंवा गुलाबी असते. आपण पेरूबद्दल बोलत आहोत. एक कप पेरू ४.२ ग्रॅम प्रथिने प्रदान करते. पेरू हा प्रथिनांचा एक उत्कृष्ट स्रोत आहे आणि निरोगी शरीर राखण्यास मदत करतो. पेरूमध्ये फायबर, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन सी देखील भरपूर प्रमाणात असते. ते खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात: पेरूमध्ये पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते, जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. पेरू रक्तातील साखर नियंत्रित करण्यास देखील मदत करते. तसेच पेरू वजन कमी करण्यासाठी देखील सेवन करता येते. पेरू खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. पेरू निरोगी त्वचा आणि केसांना देखील प्रोत्साहन देते. यह वीनर्स नकली दांतों से ३०० गुना बेहतर है! और कीमत बहुत सस्ती हैअधिक जानें अस्वीकरण (ऊळीलश्रळाशी) : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे.या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत वेबदुनिया कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# पाकिस्तानची धूळफेक



गरज संपल्यावर फेकून द्यायचे, ही पाकिस्तानची भूमिका अफगाणिस्तानला समजून चुकली आहे. तेहरिक ए तालिबान पाकिस्तान या संघटनेचा बिमोड करताना दाखविल्या जाणार्या आक्रमकतेची किंमत पाकिस्तानला चुकवावी लागणार आहे. अफगाणिस्ताननेही बदला घेण्याचा इशारा दिला आहे.

देशातील अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे लक्ष अन्यत्र वळवण्याची क्लृप्ती ट्रम्प यांच्याप्रमाणे पाकिस्तानलाही साधली आहे. 'व्हाईट हाऊस'ची धूळ असीम मुनीर यांच्या पायाला लागत असल्याने ते स्वाभाविक होय. दहशतवादी तळांना लक्ष्य करत आहोत, असे सांगत पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हल्ला केला. बलुचिस्तानमधील संघर्ष नियंत्रणाबाहेर चालला आहे. 'तेहरिक ए तालिबान पाकिस्तान' या संघटनेने आक्रमक धोरण स्वीकारले आहे. सिंधु जल करार भारताने स्थगित ठेवल्याचा फटका पाकिस्तानच्या पंजाब आणि सिंध या प्रांतांना बसू लागला असून पाकिस्तानी लष्करातही मुनीर यांच्या सर्वाधिकाराबद्दल विसंवादी सूर आहे. अशावेळी फारसा प्रतिकार होणार नाही असे लक्ष्य निवडणे ही पाकिस्तानसाठी गरज ठरते. पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हल्ला करण्याची अलीकडच्या काळातील ही दुसरी वेळ. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पाकिस्तानने तेथे हल्ला केला होता. कतार आणि तुर्की यांच्या मध्यस्थीनंतर युद्ध थांबले. दोहामध्ये त्यासाठी झालेल्या बैठकीत शांतता प्रक्रियेचा पाठपुरावा करण्यासाठी सातत्याने बैठका घेण्याचे पाकिस्तानने कबूल केले होते; पण शब्दाला जागण्याबद्दल पाकिस्तानची ख्याती नाही. 'तेहरिक ए तालिबान पाकिस्तान', या संघटनेकडून होत असलेल्या कारवायांचा मुद्दा पुन्हा तापला आणि अफगाणिस्तानवर हल्ला करण्याची संधी पाकिस्तानने त्यात शोधली. अफगाणिस्तानातील बिहसुद परिसरात पाकिस्तानने हवाई हल्ले केले.

भारताने सुनावले

अफगाणिस्तानकडे हवाई संरक्षणाचा अभाव आहे. तीच उणीव पाकिस्तानचे बळ ठरत आहे. हल्ल्यात मारले गेलेले सर्वसामान्य नागरिक आहेत, त्यात लहान मुलांचाही समावेश आहे. इतरवेळी भारताकडून सहसा प्रतिक्रिया आली नसती; मात्र यावेळी प्रथमच भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानला सुनावले. रमजानचा महिना सुरू असताना पाकिस्तानने असे कृत्य करावे हे निंदनीय आहे, असे भारताने म्हटले आहे. अलीकडच्या काळात भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील वाढत्या सहकार्याच्या पार्श्वभूमीवर भारताची प्रतिक्रिया पाकिस्तानला झोंबणार, यात शंका नाही. धर्माचा मुद्दा फक्त भारताच्या बाबतीत वापरायचा, हे पाकिस्तानचे धोरण. म्हणूनच पाकिस्तानला आरसा दाखविणे आवश्यक होते. आर्थिक आधार आणि भारतविरोध यासाठी पाकिस्तानला अमेरिकेची, म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांची साथ हवी आहे. इस्रायलकरवी पॅलेस्टाईनचा घास घेताना त्यांनी आव मात्र शांतता प्रस्थापित करण्याचा आणला आहे. इस्लामी देशांसह तथाकथित शांतता मंडळ, हा त्याचा भाग. त्यानुसार पाकिस्तानने गाझा पट्टीत आपले लष्कर पाठविणे अपेक्षित आहे. नाव शांततेचे, प्रत्यक्षात लढाई इस्लामी अतिरेकी संघटनांशी, हे दहशतवादाच्या पुरस्कर्त्या पाकिस्तानसाठी भलतेच गैरसोयीचे. अफगाणिस्तानबरोबर संघर्ष सुरू असल्याचे कारण पुढे करत गाझामध्ये आपले लष्कर पाठविण्यास जेवढा विलंब होईल तेवढा पाकिस्तानला हवा आहे. अण्वस्त्रांचे कारण देत अमेरिका इराणला उद्ध्वस्त करू पाहात आहे. त्यासाठी घेराबंदी सुरू झाली असून युद्धाला तोंड फुटलेच, तर पाकिस्तानला आपले हवाई तळ अमेरिकेला वापरण्यास द्यावे लागतील. यातून मात्र पाकिस्तानची सुटका होणे कठीण दिसते. व्यापक देशहिताचा विचार करण्याची कुवत पाकिस्तानच्या लष्करी अथवा राजकीय नेतृत्वाकडे नाही. मुळात आजघडीला देशाची सूत्रे शाहबाज शरिफ यांच्याकडे आहेत, की स्वतःच स्वतःला फील्ड मार्शल किताब बहाल करणार्या असीम मुनीर यांच्याकडे, याबद्दल संभ्रम आहे. असीम मुनीर आपले वरिष्ठ नाहीत, असे विधान संरक्षण मंत्री ख्वाजा असिफ यांनी नुकतेच केले. ती डरकाळी वाटू शकते; पण प्रत्यक्षात चिडचिड आहे! सोयीनुसार कधी शरिफ यांनी ट्रम्प यांच्या पुढाकाराने होणार्या परिषदांना उपस्थित राहायचे तर कधी सोयीने असीम मुनीर यांनी, असा खेळ सुरू आहे. अफगाणिस्तानवरील हल्ल्याकडे याच खेळाचा भाग म्हणून पाहता येईल.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




**योगा करा आणि फिट राहा!**–सध्या हॉट योग, योगालेट्स, योग एरोबिक्स, कॅन्डलेलिट योग यांसारखे नवनवीन योगप्रकारांचा ट्रेंड अलीकडच्या काळात पाहायला मिळत आहे. पिलेट्ससारखे योगप्रकार हे पाठ आणि पोटाच्या स्नायूंसाठी अतिशय उपयुक्त मानले जातात. नव्या ट्रेंडनुसार कार्यात्मक प्रशिक्षण आणि पिलेट्स यांना एकत्रित करण्यात आलं आहे. ज्यामुळे शरीराचा तोल सांभाळण्यासाठी आवश्यक असलेला समन्वय साधण्यास मदत होते. या व्यायामप्रकारात बोसू बॉल, वोबल बोर्ड्स आणि जिम बॉल्स यांची मदत घेतली जाते.

## २ Joke विनोद




दोन मित्र खूप दिवसांनी एकत्र भेटले. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या. 'तुझी बायको स्वभावाला कशी आहे रे?' पहिल्याने विचारले. 'खूप चांगली आहे' दुसरा म्हणाला. 'वा!... ऐकून बरं वाटलं!' 'तुझी रे!...' 'माझी बायको तर रोज माझी पूजा करते.' 'काय म्हणतोस?' 'हो. रोज एकदा तरी माझ्यापुढे हात नाचवून ती म्हणते आता दिवे ओवाळू का तुम्हाला?'

## ३ Message संदेश



Madam danda leke class me aayi
Madam – madam me sapne me japan pahuch gyi thi
Madam – Billu tu kaha tha kal ?
Billu – Madam me pinki ko airport pe chorne gaya tha.

## ४ Thought सुविचार




तेजस्वी नावामुळे गीताला पावित्र्य येते.
– बायरन विज्ञानविश्व

**संस्कृत सुभाषित**

**न विषादे मनः कार्य विषादो बलवत्तरः।**
**विषादो ह्रन्ति पुरुषं बालं क्रुद्ध इवोरगः।।**

अर्थ : मनात कधी विषाद आणू नये, हा विषाद फार बलवत्तर असतो जणू एखादा विषारी सर्प असावा, तसा हा विषाद असतो व तो बालांचा-पुरुषांचा नाश करतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. सुंदर पती-पत्नीचा जोडा
५. हार
८. काळे ज्वालाग्रही खनिज
११. मऊ, मृदू
११अ. दारुचा एक प्रकार
१२. यजमान, पती
१४. रक्षण करणारा
१५. बाजार
१६. पावसाची झड
१७. पापणी न हलवता (पाहणे)
१९. सरपणाचे दुकान
२१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ
२४. जोम, मस्ती
२५. अवस्था, दशा
२७. पंख
२८. तुरुंग
२९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी
३१. वर्ष
३२. अडकित्त्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ
३४. हळद पिऊन का अशी होता येणार?
३५. कागदावर आखलेला कप्पा
३७. आचारी
३९. माफी मागणारा
४२. दिवाणखाना
४३. सत्य
४४. अतिरेक, टोक
४५. मोठे गाव
४७. मातापिता
५१. कुटी
५२. कागदाचे एक परिमाण
५३. ढीग, चळत
५४. शाळेतील शिक्षिका
५५. केस काळे करण्याचे साधन
५७. वेल
५९. समुद्र
६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या
६३. लढतना मृत्यू येणे
६५. अखंड
६६. दुष्ट
६७. स्त्री
६८. रोखलेली नजर
६९. शेळी
७१. मैत्रीण
७२. ठराविक पैसे
७४. पायंडा, पद्धत
७६. दरोडा
७८. धोकादायक
८०. माणूस
८२. सूर्याचे एक नाव
८४. सटकन, पटकन
८५. मातीचा कण
८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

### उभे शब्द

१. रत्नजडित माळ
२. अंत:करण
३. किंमत
४. नमन
५. मागील अंगणाचा दरवाजा
६. मीठ
७. अरण्य
८. नवाकोरा
९. रेचक
१०. एक पालेभाजी
१३. दरारा, इभ्रत, वजन
१८. सुसर
२०. जनगणना
२२. नरमांजर
२३. पृथ्वी
२५. भूतकाळ
२६. चिंतन
२७. परीक्षा घेणारा
३०. आशीर्वाद देणारी
३१. मित्र
३३. प्रयत्न
३६. बेकरीतील एक गोड पदार्थ
३८. पहाटेची गाढ निद्रा
४०. तुळशीमाळ धारण करणारा
४१. पार्थिवावरचे वस्त्र
४५. यमपुरी
४६. घरातील मोठी माणसे
४८. घाबरणे
४९. एक बारीक धान्य
५०. पायाचे उभे हाड
५४. स्त्रीलंपट
५६. चकचकीत, स्वच्छ
५८. चांदणी
५९. भेग, चीर
६०. किल्लेदार
६२. दिवसाचा चोविसावा भाग
६४. धनुष्यबाण
६५. अफूचे बी
६७. पूर्ण नेस्तनाबूत
६९. भाजपची विद्यार्थी संघटना
७०. ज्ञाती
७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय
७५. होडी
७७. वसन, वस्त्र
७९. बशीचा जोडीदार
८१. नवरामुलगा
८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

### आडवे उत्तरे

१.रतिमदन ५.पराभव ८.कोळसा ११.नरम ११अ.रम १२.नवरा १४.रक्षक १५.हाट १६.सर १७.टकमक १९.वखार २१.दासबोध २४.रग २५.गत २७.पर २८.कारा २९.करवत ३१.सन ३२.सुप-ारी ३४.गोरी ३५.रकाना ३७.खानसामा ३९.क्षमायाचक ४२.दालन ४३.खरी ४४.कळस ४५.नगर ४७.जनकजननी ५१.झोपडी ५२.रीम ५३.चवड ५४.बाई ५५.कलप ५७.लता ५९.सागर ६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल ६७.नारी ६८.टक ६९.अजा ७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात ७६.डाका ७८.खतरनाक ८०.मानव ८२.रवि ८४.टपकन ८५.रज ८६.पदरमोड

### उभे उत्तरे

१.रत्नहार २.मन ३.दर ४.नमस्कार ५.परसदार ६.रामरस ७.वन ८.कोरा करकरीत ९.सारक १०.चाकवत १३.वट १८.मगर २०.खानेसुमारी २२.बोका २३.धरा २५.गतकाल २६.मनन २७.परीक्षक ३०.वरदायिनी ३१.सखा ३३.प्रयास ३६.नानकटाई ३८.साखरझ-ोप ४०.माळकरी ४१.कफन ४५.नरक ४६.वडीलधारी ४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी ५४.बाईलवेडा ५६.लखलखीत ५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी ६२.तास ६४.तीरकमान ६६.खसखस ६७.नायनाट ६९. अभाविप ७०.जात ७३.मन ७५.तर ७७.कापड ७९.कप ८१.वर ८३.घार



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त





### तर आज टीम इंडिया जिंकूनही मार्ग अत्यंत खडतर होणार!

**मुंबई**–टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८ टप्प्यातील सातवा सामना आज (२६ फेब्रुवारी) दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळला जाणार आहे. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर दुपारी तीन वाजता हा सामना सुरू होईल. आफ्रिकेने पहिल्या सुपर ८ सामन्यात भारताचा ७६ धावांनी पराभव केला. यामुळे स्पर्धेत भारताची विजयी मालिका संपुष्टात आली. यापूर्वी, संघाने सलग १२ सामने जिंकले होते. दरम्यान, सुपर ८ मध्ये वेस्ट इंडिजने झिम्बाब्वेचा १०७ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना विंडीजने २५४ धावा केल्या आणि झिम्बाब्वेला १४७ धावांवर रोखले. आज आफ्रिका जिंकल्यास भारताचा मार्ग खडतर दरम्यान, आफ्रिकेनं भारताला धक्का दिल्यानं सेमीफायनलचा मार्ग खडतर झाला आहे. एका बाजूला झिम्बाब्वेविरोधात मोठ्या विजयाची गरज असतानाच दक्षिण आफ्रिका सुद्धा पराभूत होईल, अशी आशा करावी लागणार आहे. आफ्रिका विजय झाल्यास भारताच्या आव्हानांमध्ये मोठी भर पडणार आहे. ज्या आफ्रिकेला नमवून भारत विजयी झाला होता तीच आफ्रिका मायदेशात भारतासाठी डोकेदुखी झाली आहे. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज हेड-टू-हेड दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजने आतापर्यंत २९ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

### टीम इंडियाचे सेमीफायनलचे तिकीट कन्फर्म?,

मुंबई–टीम इंडियाच्या सेमीफायनलची किल्ली सध्या दक्षिण आफ्रिकाच्या हातात आहे. आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम येथे दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्यात महत्त्वाचा सामना रंगला आहे. वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी स्वीकारली आहे. पण हा सामना फक्त दोन संघांपुरता मर्यादित नाही, तो भारताच्या सेमीफायनलच्या आशांशी थेट जोडलेला आहे.
दक्षिण आफ्रिका जिंकली तर भारताला कसा फायदा?
भारताच्या सेमीफायनलमध्ये पोहोचण्याचं गणित मोठ्या प्रमाणात आजच्या सामन्यावर अवलंबून आहे. जर आज दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजवर विजय मिळवला, तर त्यांचे ४ गुण होतील आणि ते थेट सेमीफायनलमध्ये प्रवेश करतील.त्याचवेळी भारताने झिम्बाब्वेविरुद्ध विजय मिळवला, तर भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांचे २-२ गुण होतील. झिम्बाब्वे सलग दोन सामने गमावल्यामुळे स्पर्धेबाहेर जाईल. अशा परिस्थितीत सेमीफायनलच्या दुसऱ्या जागेसाठी भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात १ मार्चला होणारा सामना मकरो या मरोफ ठरेल. जो संघ जिंकेल, तो थेट सेमीफायनलमध्ये प्रवेश करेल.


### वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले तर भारताचे सेमीफायनलसाठी समीकरण कसे असणार? जाणून घ्या

मुंबई–भारतीय संघाला सेमीफायनल गाठण्यासाठीचे समीकरण आता गुंतागुंतीचे झाले आहे. सुपर-८ फ ेरीतील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून भारताला ७६ धावांनी पराभव पत्करावा लागला. त्यामुळे आता गुरुवारी चेन्नईमध्ये होणाऱ्या झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या सुपर-८ सामन्यात भारतासाठी मकरो किंवा मरोफ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र सध्या भारताचं लक्ष वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामन्यावर आहे. या सामन्यात जर वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेला पराभूत केलं तर भारतासाठी कसं समीकरण असणार जाणून घेऊया.भारताला सेमीफायनलच्या आशा कायम ठेवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजला पराभूत करणं आवश्यक आहे. अन्यथा भारताच्या सेमीफायनल पात्रतेच्या शक्यतांवर मोठा परिणाम करू शकतो.

# टीम इंडियाचा झिम्बाम्बेवर दमदार विजय

**नवी दिल्ली:** आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यांमध्ये अजिंक्य राहिल्यानंतर भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या सुपर ८ फ ेरीतील पहिल्याच सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे भारतीय संघाचा सेमीफायनलमध्ये प्रवेश करण्याचा मार्ग खडतर झाला होता. पण दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजला पराभूत केल्यानंतर भारतीय संघाचा सेमीफायनलमध्ये जाण्याचा मार्ग सोपा झाला. आता झिम्बाब्वेला पराभूत करून भारतीय संघाने सेमीफायनलच्या दिशेने मजबूत पाऊल टाकलं आहे. चेन्नईत झालेल्या साम न्यात भारतीय संघाने झिम्बाब्वेसमोर विजयासाठी २५७ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना झिम्बाब्वेला १८४ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह भारतीय संघाने हा सामना ७२ धावांनी आपल्या नावावर केला.
झिम्बाब्वेला हा सामना जिंकण्यासाठी २५७ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ब्रायन बेनेटने ९७ धावांची दमदार खेळी केली. मरूमानीने २० धावांचे योगदान दिले. डियॉन मेयर्स





अवघ्या ६ धावा करून माघारी परतला. कर्णधार सिकंदर रझाने जोर

> **भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली आहे.**

लावला. पण तो अवघ्या ३१ धावा करून माघारी परतला. रायन बर्ल शून्यावर माघारी परतला.या सामन्यात झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. या सामन्यासाठी भारतीय संघाच्या बॅटिंग ऑर्डरमध्ये मोठा बदल करण्यात आला होता. अभिषेकसोबत संजूने डावाची सुरूवात केली. तर इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. या जोडीने मिळून पहिल्या विकेटसाठी ४८ धावा जोडल्या. संजू सॅमसनने २४ धावा केल्या. तर अभिषेक शर्माने ५५ धावांची खेळी केली. इशान किशनने ३८ धावांचे योगदान दिले. कर्णधार सूर्यकुमार यादवने ३३ धावा केल्या. तर शेवटी हार्दिक पांड्या आणि तिलक वर्माने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून संघाची धावसंख्या २५० पार पोहोचवली. हार्दिक पांड्या ५० धावांवर नाबाद राहिला. तर तिलक वर्माने नाबाद ४४ धावांची खेळी केली.दक्षिण आफ्रिकेविरूद्धचा सामना गमावल्यानंतर भारतीय संघाने झिम्बाब्वेविरूद्ध मोठ्या विजयाची नोंद केली आहे. त्यामुळे भारतीय संघाकडे सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी कायम आहे. भारतीय संघाचा साखळी फेरीतील पुढील सामना वेस्ट इंडिजविरूद्ध होणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी नॉकआऊट सामना असणार आहे. जो संघ हा सामना जिंकेल, तो सेमीफायनलमध्ये प्रवेश करणार आहे. हा सामना रविवारी १ मार्चला खेळवला जाणार आहे. या सामन्यात नेट रनरेट महत्वाचा नसेल, केवळ सामना जिंकून भारतीय संघ सेमीफायनलमध्ये आपलं स्थान निश्चित करू शकतो.

# भारत – वेस्ट इंडिज सामना कधी आणि कुठे होणार?

> **१ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ६:३० वा.**





**अहमदाबाद:** भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात होणारा सामना केव्हा, कधी आणि कुठे पाहता येणार? जाणून घ्या.
भारतीय संघासाठी आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाने झिम्बाब्वेसमोर विजयासाठी २५७ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना झिम्बाब्वेला १८४ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह झिम्बाब्वेने हा सामना ७२ धावांनी गमावला. दरम्यान भारतीय संघाचा पुढील सामना केव्हा, कधी आणि कुठे होणार? जाणून घ्या.
भारतीय संघ सुपर ८ फेरीत आपला शेवटचा सामना वेस्ट इंडिजविरुद्ध खेळणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी अतिशय महत्त्वाचा असणार आहे. जो संघ हा सामना जिंकेल तो थेट सेमी फायनलमध्ये प्रवेश करणार आहे.
भारत – वेस्ट इंडिज सामना कुठे होणार आहे?भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांमध्ये होणारा सामना कोलकात्यातील इडन गार्डन्सच्या मैदानावर खेळवला जाणार आहे.भारत – वेस्ट इंडिज सामना किती वाजता सुरू होणार?

> **जो संघ हा सामना जिंकेल तो थेट सेमी फायनलमध्ये प्रवेश करणार**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात होणारा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. तर नाणेफेक संध्याकाळी ६:३० वाजता होणार आहे.
भारत – वेस्ट इंडिज सामना लाईव्ह कुठे पाहता येणार?
हा सामना तुम्ही स्टार स्पोर्ट्सवर लाईव्ह पाहू शकता.
भारत – वेस्ट इंडिज सामन्याचे लाईव्ह स्ट्रिमिंग कुठे पाहता येणार?
या सामन्याचे लाईव्ह स्ट्रिमिंग तुम्ही जिओ हॉटस्टारवर लाईव्ह पाहू शकता.
भारताचा दमदार विजय
भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २५६ धावांचा डोंगर उभारला. ही टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासातील दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. या धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेला १८४ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह भारतीय संघाने हा सामना ७२ धावांनी आपल्या नावावर केला.

## भारतीय क्रिकेट संघातील खेळाडू रिंकू सिंग याच्या वडिलांचे निधन

**ग्रेटर नोएडा:**भारतीय क्रिकेट संघातील खेळाडू रिंकू सिंग याच्या वडिलांचे निधन झाले आहे. (झर्हें: खपींीरसीरा) ठळपर्ज्ञी डळपसह ऋरींहशी ऊळशी : भारतीय क्रिकेटपटू रिंकू सिंग याचे वडील, खानचंद सिंग यांचे शुक्रवारी निधन झाले आहे. स्टेज ४ यकृताच्या कर्करोगाशी दीर्घकाळ झुंज दिल्यानंतर निधन झाले. माजी भारतीय फिरकीपटू हरभजन सिंग याने सोशल मीडियावर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे. खानचंद सिंग यांच्यावर ग्रेटर नोएडा येथील यथार्थ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते.या आठवड्याच्या सुरुवातीला रिंकूच्या वडिलांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले होते. वडिलांच्या आजारपणामुळे २८ वर्षीय रिंकू सिंगने चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर झालेल्या झिम्बाब्वेविरुद्धच्या टी२० वर्ल्डकप २०२६ सुपर ८ सामन्यापूर्वी घरी गेला होता. रिंकू सामना सुरू होण्यापूर्वी संघात परतला , मात्र त्याला



प्लेईग इलेव्हनमध्ये संधी मि ळाली नाही. त्याच्या ऐवजी संघात संजू सॅमसनला स्थान देण्यात आले होते.दरम्यान सोशल मीडियावर पोस्ट करताना हरभजन सिंगने असेही म्हटले की, टी२० विश्वचषकादरम्यान रिंकू त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडत असला तरी त्याच्या संपूर्ण कुटुंबासाठी हा काळ अत्यंत कठीण असल्याची आपल्याला जाणीव असल्याचे म्हटले आहे. ङ्गरिंकू सिंगचे वडील श्री खानचंद सिंगजी यांच्या निधनाचे वृत्त ऐकून दु:ख झाले. तो टी२० विश्वचषकादरम्यान त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडत असला तरी हा काळ नक्कीच रिंकू आणि त्याच्या कुटुंबासाठी अत्यंत कठीण असणार आहे,ङ्ग असे हरभजनने एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

# सूर्याचा एकच डिसिजन ठरला गेम चेंज; सगळ्यात मोठे टेन्शन मिटले!



चेन्नई-टी-२० वर्ल्ड कपच्या करो या मरो सामन्यात टीम इंडियाने झिम्बाब्वेविरुद्ध धमाका केला आहे. टॉस हरल्यानंतर पहिले बॅटिंगला उतरलेल्या टीम इंडियाने २० ओव्हरमध्ये ४ विकेट गमावून २५६ रन केल्या. टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासातला टीम इंडियाचा हा सर्वाधिक स्कोअर आहे. तर या टी-२० वर्ल्ड कपमधला कोणत्याही टीमचा हा सर्वाधिक स्कोअर ठरला आहे.
वर्ल्ड कपच्या पहिल्या चार सामन्यांमध्ये संघर्ष करणाऱ्या अभिषेक शर्माने अर्धशतक केलं. अभिषेकने ३० बॉलमध्ये १८३.३३ च्या स्ट्राईक रेटने ५५ रन केले, ज्यात ४ फोर आणि ४ सिक्सचा समावेश होता. तर संजू सॅमसनने २४, इशान किशनने ३८ आणि सूर्यकुमार यादवने १३ बॉलमध्ये ३३ रनची खेळी केली. हार्दिक पांड्याने २३ बॉलमध्ये ४ सिक्स आणि २ फोरच्या मदतीने नाबाद ५० आणि तिलक वर्माने १६ बॉलमध्ये ४ सिक्स आणि ३ फोरच्या मदतीने नाबाद ४४ रन केल्या. तिलकने २७५ च्या स्ट्राईक रेटने आणि हार्दिकने २१७ च्या स्ट्राईक रेटने बॅटिंग केली.
या सामन्यात टीम इंडियाने दोन बदल केले. वॉशिंग्टन सुंदरऐवजी अक्षर पटेल आणि रिंकू सिंगऐवजी संजू सॅमसनची टीममध्ये निवड झाली. तसंच टीमने खेळाडूंच्या बॅटिंग पोजिशनमध्येही बदल केले. संजू सॅमसन हा ओपनिंगला आला, तर इशान तिसऱ्या, सूर्या चौथ्या, हार्दिक पाचव्या आणि तिलक सहाव्या क्रमांकावर आला. टी-२० वर्ल्ड कपमध्ये तिलक मिडल ऑर्डरमध्ये संघर्ष करत होता, पण त्याला सहाव्या क्रमांकावर बॅटिंगला पाठवण्याचा निर्णय गेम चेंजर ठरला, यामुळे तिलक वर्माला फॉर्ममध्ये यायलाही मदत मिळाली. सुपर-८ च्या पहिल्या सामन्यामध्ये टीम इंडियाचा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ रननी पराभव झाला होता, त्यामुळे सेमी फायनलला पोहोचण्यासाठी टीम इंडियाला आधी झिम्बाब्वे आणि त्यानंतर १ मार्चला वेस्ट इंडिजचा पराभव करणं गरजेचं आहे.

# टी-२० विश्वचषक:दक्षिण आफ्रिकेचा वेस्ट इंडिजवर दणदणीत विजय

**अहमदाबाद**–वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकप २०२६ अंतर्गत सुपर ८ फेरीचा सामना दक्षिण आफ्रिकेने नऊ विकेट राखून जिंकला. या विजयामुळे दक्षिण आफ्रिकेचे सेमी फायनलच्या दिशेने आणखी एक दमदार पाऊल पडले आहे. वेस्ट इंडिजच्या सेमी फायनल खेळण्याच्या आशा धूसर झाल्या आहेत. भारताची सेमी फायनल खेळण्याची आशा जिवंत राहिली आहे.
सुपर ८ मध्ये सुरुवातीला झिम्बाब्वे विरुद्धचा सामना १०७ धावांनी तर दक्षिण आफ्रिकेने भारताविरूद्धचा सामना ७६ धावांनी जिंकला आहे. यामुळे वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना दक्षिण आफ्रिकेने जिंकला तरच भारताची सेमी फायनल खेळण्याची आशा जिवंत राहणार होती. आता टीम इंडियाला झिम्बाब्वे विरुद्धचा सामना जिंकल्यास रविवारी वेस्ट इंडिजविरुद्ध विजय मिळवत सेमी फायनल गाठणे शक्य होणार आहे.
वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेने गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजने २० षटकांत आठ बाद १७६ धावा केल्या तर दक्षिण आफ्रिकेने १६.१ षटकांत एक बाद १७७ धावा करून सामना ९ विकेट राखून आरामात जिंकला. दक्षिण आफ्रिकेने २३ चेंडू आणि ९ विकेट राखून वेस्ट इंडिज विरुद्ध विजय मिळवला. या विजयामुळे सुपर ८ फेरीत चार गुण आणि दोन विजयांसह दक्षिण ग्रुप एकमध्ये पहिल्या स्थानावर आहे. त्यांची धावगती +२,८९० आहे. भारताने झिम्बाब्वे विरुद्धचा सामना जिंकल्यास दक्षिण आफ्रिका सेमी फायनलसाठी पात्र होणार आहे.दक्षिण आफ्रिकेने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करुन वेस्ट इंडिजला २०० चा



टप्पा ओलांडू दिला नाही. कागिसो रबाडा आणि लुंगी न्गिडीने वेस्ट इंडिजला हुशारीने सापळ्यात अडकवले. याउलट वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजीला आळा घालणे जमले नाही. दक्षिण आफ्रिकेने सर्वांगीण खेळ कायम राखत टी२० वर्ल्डकपमध्ये वेस्ट इंडिजवर ९ विकेटनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने सेमी फायनल फेरीतले स्थान जवळपास पक्कं केलं आहे. गुरुवारी वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेसमोर १७७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग दक्षिण आफ्रिकेने एकच विकेट गमावत १६.१ षटकात पूर्ण केला. दक्षिण आफ्रिकेसाठी कर्णधार एडेन मार्करमने अर्धशतकी खेळी केली. दक्षिण आफ्रिकेकडून मार्करम आणि क्विंटन डी कॉक यांनी आक्रमक सुरुवात केली होती. डी कॉकने स्फोटक फलंदाजी करताना मार्करमसोबत पहिल्या विकेटसाठी ८ षटकातच ९५ धावांची भागीदारी केली. ८ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर डी कॉकला रोस्टन चेसने जेसन होल्डरच्या हातून झेलबाद केले. डी कॉकने २४ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ४७ धावांची खेळी केली. त्यानंतरही रायन रिकल्टनने कर्णधाराची दमदार साथ देत संघाला विजयापर्यंत पोहचवले. वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना विकेट्स पटकावणं आणि धावा रोखणं या दोन्ही आघाड्यांवर अपयश आलं. एडन मारक्रमलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.
आफ्रिकेचा कर्णधार एडन मारक्रमने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. मात्र त्यांच्या गोलंदाजांनी अत्यंत शिस्तबद्ध मारा करत वेस्ट इंडिजच्या ताकदवान फटकेबाजांना रोखलं. कर्णधार शे होपने चांगली सुरुवात केली होती. मात्र कागिसो रबाडा आणि लुंगी एन्गिडी यांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना सापळ्यात रचलं. शिमोरन हेटमायरला पहिल्याच चेंडूवर जीवदान मिळाले. मात्र तो त्याच षटकात तंबूत परतला.
टी-२० विश्वचषकाच्या सुपर-८ फेरीतील अत्यंत महत्त्वाच्या लढतीत वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी आपल्या जिद्दीचे दर्शन घडवले. दक्षिण आफ्रिकेच्या भेदक माऱ्यामुळे ७१ धावांवर ६ गडी गमावलेल्या वेस्ट इंडिजने जेसन होल्डर आणि रोमॅरियो शेफर्ड यांच्या 'रेस्क्यू ऑपरेशन'च्या जोरावर २० षटकांत ८ बाद १७६ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली.नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या वेस्ट इंडिजची सुरुवात एखाद्या दुस्वप्नासारखी झाली. सलामीवीर शाई होप (१६) आणि आक्रमक ब्रँडन किंग (२१) स्वस्तात बाद झाले.

# महावितरणच्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या कामगिरीचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने गौरव

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वाधिकि अत्याधुनकि स्मार्ट मीटर बसवून देशात प्रथम क्रमांक पटकावण्याच्या महाराष्ट्राच्या कामगिरीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या महावितरणचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने मुंबई येथे बुधवारी (२५ फेब्रुवारी) गौरव करण्यात आला. मुंबईतील सहारा स्टार हॉटेलमध्ये आयोजित या कार्यक्रमात ९२.७ बिग एफएम या लोकप्रिय रेडिओ चॅनलच्या वतीने विविध क्षेत्रात कल्पकता व नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला.

मुंबई महानगरपालकिच्या महापौर श्रीमती रितू तावडे आणि अभिनेत्री ईशा देवोल यांच्या हस्ते महावितरणच्या वतीने कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता श्री. प्रवीण




परदेशी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणा सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. आशिष शेलार, जेष्ठ अभिनेते बोम्मण ईराणी यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला होती. पुरस्कार वितरणाच्या नेत्रदिपक कार्यक्रमाला तर सिनेसृष्टी, सामाजिक, राजकीय, उद्योग, कला क्षेत्रातील नामवंत उपस्थित होत्या.

ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे ८८.५० लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. राज्याच्या या यशात महावितरणची कामगिरी प्रमुख आहे. शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट ८० पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. तसेच औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे.

राज्यात ९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात आला. यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्मार्ट मीटरच्या लाभांबाबत राज्यभरात जनजागृती करण्यात आली.

फोटोओळ- स्मार्ट मीटर बसवण्यात देशात अव्वल स्थान पटकावण्याच्या कामगिरीबद्दल महावतिरणला मिळालेला 'बिग इम्पॅक्ट' पुरस्कार मुंबई मनपाच्या महापौर श्रीमती रितू तावडे आणि अभिनेत्री ईशा देवोल यांच्या हस्ते स्वीकारताना कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता श्री. प्रवीण परदेशी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार.

## क्रिडा संचालक डॉ. अशोक वाघमारे यांचा कुलगुरु यांच्याकडून गौरव



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ. अशोक वाघमारे यांचा कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते नुकताच नांदेड येथे गौरव करण्यात आला.

डॉ. अशोक वाघमारे यांच्या नेतृत्वाखालील संघाने गडचिरोली येथे झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत नांदेड विद्यापीठाला गोल्ड मेडल प्राप्त झाले. तसेच नांदेड विद्यापीठात डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या क्रीडा महोत्सवात डॉ. वाघमारे यांच्याकडे सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष पद होते. याचेही उत्तम काम त्यांनी केल्याबद्दल त्यांचा हा सत्कार करण्यात आला. डॉ. अशोक वाघमारे यांच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण आदीसह विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## गारपीट आणि कायदा सुव्यवस्थे संदर्भात गृहराज्यमंत्र्यांना निवेदन तात्काळ पंचनाम्याचे आदेश दिल्याची शिवसेना जिल्हाप्रमुख दाने यांची माहिती

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर व लातूर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी संदर्भात गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्या संदर्भात पोलीस अधीक्षकांना निर्देश दिले असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी दिली.

दोन दिवसांपूर्वी रेणापूर व लातूर तालुक्यात गारपीट झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. ज्वारी, गहू,हरभरा ही पिके भुईसपाट झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला.या संदर्भात तात्काळ पंचनामे करून मदत करावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी केली होती.

जिल्ह्यात मागील काही दिवसात कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. खून, चोऱ्या, वाटमाऱ्या ,गोळीबार, अवैध्य धंदे, शेतकऱ्यांच्या शेतातील जनावरे, मोटरी , वायर, केबल चोरी असे प्रकार घडत आहेत. कोयता गँग दहशत पसरवत आहे.दरोडे पडत आहेत. या संदर्भातही कारवाई करावी,असे निवेदन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना सचिन दाने यांनी दिले होते.

मुंबईत भेटून प्रत्यक्ष निवेदने सादर केल्यानंतर योगेश कदम यांनी गारपीटी संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पंचनामे करून अहवाल सादर करावा, असे आदेश दिले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षकांनाही निर्देश दिले आहेत. गृह राज्यमंत्र्यांनी थेट आदेश दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीचे आता तात्काळ पंचनामे होऊ शकणार आहेत.वाढती गुंडगिरी व दहशत मोडून काढण्यासाठी थेट गृहराज्यमंत्री यांचे आदेश असल्याने पोलीस तात्काळ कामाला लागणार आहेत. यामुळे जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता व गारपीट झाल्याने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा मिळणार असल्याची माहितीही शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी दिली.

## श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी :** एनएमएमएस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेला श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवीचे २५५ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात ७० विद्यार्थ्यांना १०० पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांना एनएमएमएस परीक्षा प्रमुख प्रदीप कटके तसेच मार्गदर्शक शिक्षक सुनीता बनसोडे, राजेश्वर डोंगरे, अशोक रायते, नितीन बिरादार यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दयानंद कला महाविद्यालयात फ्युजन २०२६ राज्यस्तरीय फॅशन शो स्पर्धा संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था, दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील फॅशन आणि ड्रेस डिझाइन विभागाच्या वतीने भव्य व दिमाखदार फ्युजन २०२६ राज्यस्तरीय फॅशन शो स्पर्धा दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी यशस्वीरित्या संपन्न झाली.

सौ. संगीता लाहोटी यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलनाने या फॅशन शो स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. सौ. पद्मा तोष्णीवाल-बियाणी, परीक्षक वसुधा माने, श्रध्दा सोनटक्के (बैंगलोर), संस्था सदस्य विशालजी अग्रवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, सौ. स्मिता विशाल अग्रवाल, सौ. देवकन्या सागर मंत्री, सौ.निकेता चैतन्य भार्गव, सुश्री शांता जैन, सौ. जयमाला शिवाजी गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

महाराष्ट्रातील २२ महाविद्यालयांमधून २६० युवक-युवतींनी या स्पर्धेत उत्स्फ ूर्त सहभाग नोंदविला. विविध सत्रे व फ ऱ्यांमधून ही स्पर्धा अत्यंत रंगतदार झाली. स्पर्धक विद्यार्थ्यांनी केवळ आकर्षक वेशभूषांची निर्मितीच केली नाही, तर आत्मविश्वासाने कॅटवॉक करत प्रभावी सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. ही स्पर्धा युवक-युवतींसाठी करिअरच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरली. संस्थेच्या सुसज्ज सभागृहात नेत्रदीपक प्रकाशयोजना, उत्कृष्ट संगीत संयोजन आणि शिस्तबद्ध नियोजनामुळे हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी व संस्मरणीय ठरला.

या उपक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव श्री. रमेशजी बियाणी यांनी शुभेच्छा दिल्या तसेच सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाची मोलाची साथ लाभली.

महाविद्यालयात फैशन आणि ड्रेस डिझाईन विभाग मागील १५ वर्षांपासून बी. ए. व एम. ए. वर्गासाठी अविरतपणे अत्याधुनिक फॅशन आणि ड्रेस डिझाईन विषयाचे शिक्षण देत आहे. येथून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर यशस्वी उद्योजक म्हणून कार्य करीत आहेत. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख प्रा. सुवर्णा लवंद (नाईक), प्रा. हर्षा जैन, प्रा. पल्लवी देशमुख, प्रा. दीपा नीलावार, प्रा. प्रीति बिराजदार, प्रा. मानसी आग्रे प्रा. भाग्यश्री कुलकर्णी आणि फॅशन डिझाइन विभागातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीना घुमे व प्रा. सविता कोत्तावार यांनी केले.

स्पर्धकांना प्रथम पारितोषक ११००० रुपये, द्वितीय ७००० व तृतीय ५००० त्याचबरोबर प्रत्येक थीमनुसार प्रथम १००० द्वितीय ७०० व तृतीय ५०० असे एकूण २५ भरघोस बक्षिसे, ट्रॉफी व सर्टिफिकेट देण्यात आले. दयानंद कला महाविद्यालयाच्या फॅशन आणि ड्रेस डिझाइन विभागाने साकारलेला हा उपक्रम नेत्रदीपक व अविस्मरणीय ठरला.

## दयानंद विज्ञानच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सायंटिफिक रांगोळी स्पर्धा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञानदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनानुसार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंटिफिक रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र विभागातील डॉ. श्याम इबाते उपस्थित होते.स्पर्धेच्या परीक्षक म्हणून प्रा.ए.एस. कांबळे व प्रा.पी.एस.धरणे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी शेख सरिना हिने केले.

या रांगोळी स्पर्धेसाठी ''पर्यावरण व शाश्वत विकास'', ''पर्यावरणीय सूक्ष्मजीवशास्त्र'', ''विज्ञान व पर्यावरणशास्त्र'', ''मानवी शरीररचना व आरोग्य'', ''सूक्ष्मजीवांची रचना व आकारशास्त्र'', तसेच ''पर्यावरणीय व औद्योगिक सूक्ष्मजीवशास्त्र'' असे विविध वैज्ञानिक विषय देण्यात आलेले होते. विद्यार्थिनींनी या विषयांवर आकर्षक, सुबक व माहितीपूर्ण रांगोळ्या साकारून त्यांचे थोडक्यात शास्त्रीय स्पष्टीकरणही सादर केले.स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सदरील स्पर्धेत साक्षी शिरामे व सरीना शेख यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. महाजन प्रणिता व पाटील वैष्णवी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला, तर पाटील निकिता व पाटील ऋतुजा, पुरी स्वरांजली व बिरादार नंदिनी यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. आनंदिता बायले व पवार पूजा यांनी उत्तेजनार्थ परितोषिक प्राप्त केले.ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विभागप्रमुख डॉ. राहुल मोरे व स्पर्धेच्या संयोजिका प्रा.संध्याराणी टेकाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. डॉ. दीप्ती ढेरे, प्रा. महेश करळे, प्रा.शितल पाटील, प्रा. शैलजा धुतेकर, प्रा.अनुराधा इंगळे,प्रा.राधिका मालू तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी माधव सूर्यवंशी, अशोक मदने व हरिओम पाटोळे यांनीही सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने कौतुक करण्यात आले.

## कृषी क्षेत्रातील सौर ऊर्जेच्या कामगिरीसाठी महावितरणला बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्ड

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणचा नवी दिल्ली येथे बुधवारी (दि. २४) २०२६ च्या बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डने गौरव करण्यात आला. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात तब्बल १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा



निर्मितीसाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही या योजनेला मोठी गती दिली आहे.

बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डसाठी रस्ते, बंदरे, वीज, शहरी वाहतूक, पाणी आदी ८ क्षेत्रांतील पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यात येते. यंदा देशातील सुमारे १४५ प्रकल्पांचे मूल्यमापन करून निती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमिताभ कांत यांच्या अध्यक्षतेखालील २५ सदस्यांच्या निवड समितीने पुरस्कारांसाठी प्रकल्पांची निवड जाहीर केली. यात वीज क्षेत्रामध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणची देशपातळीवर पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

जगातील सर्वांत मोठा विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १० लाख २५ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. तब्बल २३१ विकासकांकडून या योजनेमध्ये १६ हजार मेगावॅटचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प वेगाने उभारण्यात येत आहेत.

शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

## ऑनलाईन खाद्यपदार्थ वितरणात ग्राहकांच्या सुरक्षेसाठी कायदयात सुधारणा करणार!

### माजी मंत्री, आमदार अमित देशमुखांच्या प्रश्नावर सरकारची मोठी घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** ऑनलाईन फूड डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्यांकडून ब्लिंकइट, स्विगी, झोमॅटो ग्राहकांना कालबाह्य () अन्नपदार्थ मिळण्याच्या वाढत्या तक्रारींची दखल आज विधानसभेत घेण्यात आली. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मांडलेल्या तारांकित प्रश्नावर उत्तर देताना, अन्न व औषध प्रशासन () मंत्री नरहरी झिरवाळ यांनी या कंपन्यांवर कायदेशीर बंधन घालण्याचे आश्वासन दिले.

महाराष्ट्र विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे सुरू असून माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी कालबाह्य पदार्थांची विक्री पुण्यातील ब्लिंकइट () सेवेद्वारे नेमके कोणते कालबाह्य पदार्थ वितरित झाले? सेल्फ डिक्लेरेशन (स्वयं घोषणापत्र) अन्नपदार्थांचा दर्जा आणि मुदतीबाबत कंपन्यांना सेल्फ डिक्लेरेशन देणे अनिवार्य करण्यासाठी कायद्यात तरतूद करणार



का? असा तारांकीत प्रश्नोत्तर दरम्यान प्रश्न उपस्थित केला.

यावर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी पुण्यातील घटनेत नेमके कोणते पदार्थ कालबाह्य होते, याची माहिती सध्या उपलब्ध नसली तरी ती लवकरच सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल. ऑनलाईन अन्न वितरण करणाऱ्या सर्व कंपन्यांना आता सेल्फ डिक्लेरेशन देणे बंधनकारक करण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्यात येईल. यामुळे वितरीत होणारे अन्नपदार्थ दर्जेदार आणि मुदतीमधील असल्याची खात्री कंपन्यांना द्यावी लागेल.

आमदार अमित देशमुख यांनी ही बाब नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असल्याचे सांगून, अशा कंपन्यांवर कठोर कारवाईची मागणी केली. यावर हस्तेक्षेप करीत विधानसभा अध्यक्ष मा. श्री. राहुल नार्वेकर यांनी या सूचनेचे गांभीर्य ओळखून शासनाला यावर तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

केवळ डिलिव्हरीच नव्हे तर वितरणाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी नवीन नियमावली आमदार अमित देशमुखांच्या पाठपुराव्यामुळे तयार होणार असून लातूरसह राज्यातील सर्वच ग्राहकांच्या सुरक्षेसाठी हा प्रश्न महत्त्वाचा ठरला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मांजरा साखर कारखान्याचे ११,११,१२१. व्या साखर पोत्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या हस्ते पुजन

## त्रिपक्षीय करारानुसर कर्मचाऱ्यांना १० टक्के पगार वाढ

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यात सहकार क्षेत्रातील नावलौकिक असलेल्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्यातील चालु गळीत हंगाम २०२५-२६ मधील उत्पादीत ११,११,१२१ व्या साखर पोत्याचे पुजन माजी मंत्री तथा कारखान्याचे चेअरमन दिलीपरावजी देशमुख साहेब व लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख साहेब यांच्या शुभ हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये गुरुवारी सायंकाळी करण्यात आले यावेळी मांजरा परिवारातील संस्थांचे चेअरमन संचालक मंडळ अधिकारी उपस्थित होते



**कर्मचाऱ्यांना १० टक्के**

**पगारवाढ : माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची घोषणा**

यावेळी बोलताना माजी मंत्री तथा चेअरमन दिलीपराव देशमुख साहेब यांनी कारखान्याचे कर्मचारी यांनी १०१ दिवसात उत्तम गाळप केले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले व कारखान्यातील कर्मचारी यांना त्रिपक्षीय करारानुसार ठरलेली १०% पगार वाढ लागू करत असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले व कारखान्याने चालु गळीत हंगामाचे गाळप दि. १८/११/२०२५ रोजी चालु झाले असुन कारखान्याने दि. २६/०२/२०२६ अखेर १०१ दिवसात कार्यक्षमतेचा पुरेपुर वापर करुन ६,७२,२५० मे.टन गाळप करुन बी हेवी मोलसेस व सिरप इथेनॉलसह सरासरी १२.२८% साखर उताऱ्यासह ५,५२,८०० क्विंटल साखर उत्पादीत केली कारखान्याचे आसवाणी प्रकल्पही सुरु आहे यामध्ये १,१५,४९,४७२ लिटर इथेनॉल उत्पादन व तसेच कारखान्याच्या सहविज निर्मिती प्रकल्पातुन २,३१,१०,००० युनिटचे उत्पादन झाले आहे. अशी माहिती त्यांनी यावेळी बोलताना दिली.

यावेळी कार्यक्रमास विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष वैजनाथराव शिंदे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ड प्रमोद जाधव, बाजार समिती सभापती जगदीश बावणे, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव ठाकुर (देशमुख), उपाध्यक्ष ड. प्रविण पाटील, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, माजी उपाध्यक्ष तथा संचालक श्री शैल्य उटगे, संचालक, शेती कमिटी अध्यक्ष कैलास पाटील, सर्वश्री मदन भिसे, नवनाथ काळे, वसंत ऊफाडे, धनराज दाताळ, तात्यासाहेब देशमुख ज्ञानेश्वर पवार, भैरु कदम, सदाशिव कदम, निळकंठ बचाटे, सचिन शिंदे, दयानंद बिडवे, अरुण कापरे, विलास चामले, शंकरराव बोळंगे, अनिल दरकसे, बालाजी पांढरे, श्रीकृष्ण काळे, सुरेश चव्हाण, शत्रुघ्न पाटील, तानाजी जाधव कार्यकारी संचालक पंडित देसाई , शेतकरी सभासद व कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये चिमुकल्यांनी मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम वि. वा. शिरवाडकर (कवी कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेला शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते पुष्पहार घालून प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी

या बोलांनी सुरुवात करून शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मराठी राजभाषा दिनाविषयी माहिती दिली. मराठी राजभाषा दिनाला मराठी गौरव दिन असेही म्हटलं जातं. संपूर्ण महाराष्ट्रात मराठी राजभाषा दिन मोठ्या आनंदात साजरा केला जातो. वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी त्यांचा जन्मदिन मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो हे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी केले. सर्व विद्यार्थी, शिक्षिकांनी वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लातूरला होणार मराविमं अधिकारी संघटनेचे ४८ वे राज्यव्यापी अधिवेशन

### राज्यभरातून शेकडो वरिष्ठ अधिकारी लावणार हजेरी

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिकारी संघटनेचे ४८ वे राज्यव्यापी अधिवेशन २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी लातूर मध्ये संपन्न हेणार आहे. कार्निवल रिसॉर्टमध्ये आयोजित दोन दिवशीय अधिवेशनासाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून महावितरण, महापारेषण, महानिर्मिती आणि सूत्रधारी कंपनीतील वर्ग १ आणि वर्ग २ चे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री ना. सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते उद्घाटन होणाऱ्या या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री राजेंद्र पवार राहणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महावितरणचे संचालक (संचालन) श्री सचिन तालेवार, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री परेश भागवत, महापारेषणचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सौ. सुचिता भिकाने, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) डॉ. नितीन वाघ, महावितरणच्या लसतूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अरविंद बुलबुले हे उपस्थित राहणार आहेत. सन १९७८ साली स्थापन झालेली महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड ऑफिसर्स असोसिएशन ही महाराष्ट्रातील वीज क्षेत्रातील अग्रगण्य शासकीय कंपनी आहे. तीनही कंपन्यांतील वित्त व लेखा, मानव संसाधन, औद्योगिक संबंध, माहिती व तंत्रज्ञान, सुरक्षा व अंमलबजावणी, जनसंपर्क व विधी विभागातील अतांत्रिक अधिकाऱ्यांचे नेतृत्त्व करणारी एकमेव बलाढ्य संघटना आहे.

संघटनेच्या राज्यव्यापी वार्षिक ४८ व्या अधिवेशनात ऊर्जा क्षेत्रातील तिन्ही कंपन्यांची सद्यस्थिती, खासगीकरण व वीज उद्योग आर्थिक सक्षमीकरण, अतांत्रिक अधिकाऱ्यांची सरळसेवा भरती, पदोन्नती, मनुष्यबळ पुनर्रचना यावर विचार मंथन होणार असल्याने हे अधिवेशन महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तिन्ही कंपन्यांच्या वाटचालीत दिशादर्शक ठरेल, असा विश्वास संघटनेचे अध्यक्ष दिनेश लडकत, सरचिटणीस संजय खाडे, संघटन सचिव विजय गुळदगड आणि केंद्रीय कार्यकारिणीने व्यक्त केला आहे.

अधिवेशन यशस्वी करण्यासाठी अधिकारी संघटनेचे केंद्रीय सहसचिव श्री अजय गुळवे, केंद्रीय सहसचिव श्री उमेश काळे, लातूर परिमंडळ कार्यकारिणीचे अध्यक्ष रामानंद पडवळ, सचिव दिनेश ठाकूर, अभिजीत ढाकणे, अजित जैन, मनोज पेठकर, संतोष महापुरे, दिलीप अकोसकर, महादेव सुडे, सविता पवार तसेच सल्लागार श्री चेतन वाघ, जालिंदर मंगळवेडेकर यांच्यासह लातूर परिमंडल कार्यकारिणीचे सर्व सभासद परिश्रम घेत आहेत.

शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात वेगळा पॅटर्न निर्माण करून एक वेगळं अस्तित्व निर्माण केलेल्या लातूर या ऐतिहासिक नगरीत होणाऱ्या ४८ व्या वार्षिक अधिवेशनास सर्व सभासदांनी, पदाधिकाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे लातूर परिमंडळ कार्यकारीनिचे अध्यक्ष रामानंद पडवळ यांनी केले आहे.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम वि. वा. शिरवाडकर (कवी कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेला शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, विद्या पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

शाळेची विद्यार्थिनी वैष्णवी बरुरे हिने वि. वा. शिरवाडकर यांच्या जीवनाविषयी माहिती दिली. वि. वा. शिरवाडकर हे प्रसिद्ध कवी, नाटककार व कादंबरीकार होते. दुसरा पेशवा, वीज म्हणाली धरतीला, नटसम्राट, राजमुकुट इत्यादी त्यांची गाजलेली नाटके आहेत. त्यांना पद्मभूषण समवेत अनेक राज्य व राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. मराठी साहित्याच्या क्षेत्रात त्यांचे कार्य खूप महत्वाचे होते आणि त्यांचे कार्य सन्मान करण्यासाठी दरवर्षी त्यांचा जन्मदिन मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो हे त्यांनी सांगितले.

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून शाळेचे विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकवृन्दना मराठी राजभाषा दिनाविषयी शुभेच्छा दिल्या.

माय मराठीचा दिमाख आगळा, वर्णाक्षर अन् बाराखडीचा साज वेगळा, विरामचिन्हांच्या अलंकाराने ती सजली, जय महाराष्ट्र, जय शिवराय, जय मराठी

सर्व विद्यार्थी व शिक्षक, शिक्षिकांनी वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेची विद्यार्थिनी श्रद्धा शिंदे हिने केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## मराठी समर्थ ..

अभिजात रे भाषा
माय मराठी समर्थ
न जाणले सामर्थ्य
पदउपयोग किमर्थ

लढा लागला द्याया
करी प्रयासार्थ शर्थ
प्राप्तमानंकनाचा रे
किती कळला अर्थ

योग्य संवर्धन व्हावे
पूर्णविकासप्रित्यर्थ
स्थापनहोतीलं केंद्रे
मराठी अध्ययनार्थ

खासविद्यापीठउभी
कमी ना निधि अर्थ
डिजिटल रुपा जपे
साहित्य धन कृतार्थ

घे आंतरराष्ट्रीयदर्जा
विद्यापीठ बने तीर्थ
जागतिक स्थरमिळे
गौरवसत्कार यतार्थ

भाषा रुची वृद्धिंगत
शिक्षण घेती तत्वार्थ
आकृष्ट छात्र उत्कृष्ट
भाषा श्रेष्ठत्व गर्भार्थ

एकट्या नसो स्वार्थ
घडे अखिलपरमार्थ
कैकजणांचीतपस्या
हा जाणा खचितार्थ

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## चाकूर-नांदगाव येथे एमआयडीसीला हिरवा कंदील; संपादन प्रक्रिया सुरू!

### सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या पाठपुरावाला यश

**नळेगाव/अजगर मजकुरी :** अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघातील चाकूर तालुक्यातील मौजे नांदगाव येथे औद्योगिक क्षेत्र (चखऊ) स्थापन करण्यास दि. ०७.०३.२०२४ रोजी झालेल्या १६२ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये मान्यता मिळाली असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ व कलम २ (ग) मधील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत.



चाकूर तालुक्यातील तरुण उद्योजकांना हक्काची औद्योगिक वसाहत मिळावी, या उद्देशाने मी सातत्याने पाठपुरावा केला. माझ्या या प्रयत्नांना यश आले असून नांदगाव येथे एमआयडीसी स्थापनेसाठी जागा संपादन प्रक्रिया सुरू झाली या बद्दल मोठे समाधान वाटत आहे.

औद्योगिक क्षेत्र (MIDC) यांच्या वतीने जमीन खरेदीसाठी प्रस्ताव मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली असून यासंदर्भात वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. इच्छुक उद्योजकांनी आपले प्रस्ताव उद्योग विभागाकडे सादर करावेत.

लातूर-नांदेड महामार्गावर आष्टामोड परिसरात औद्योगिक वसाहत व ऑटो इंडस्ट्री उभारणीच्या दृष्टीनेही ही मोठी संधी ठरणार आहे. काही महिन्यांपूर्वी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी मंत्रालयात माझ्यासह उद्योग विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात झाली आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे चाकूर व अहमदपूर तालुक्यासह संपूर्ण लातूर जिल्ह्यात उद्योगवाढीस मोठी चालना मिळणार असून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

या निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस जी, उपमुख्यमंत्री श्रीमती. सुनेत्रावहिनी अजितदादा पवार जी, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे जी तसेच उद्योग मंत्री श्री. उदय सामंत जी यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

आजपासून चाकूरच्या औद्योगिक विकासाचा नवा अध्याय आता सुरू झाला आहे!

## कर भरणे म्हणजे तोटा नसून भविष्याची गुंतवणूक : डॉ. दुर्गादास चौधरी

**अहमदपूर/प्रतिनिधी :** माणूस आपल्या उत्पन्नावरील कर भरतो, ही त्याच्या उत्पन्नातील घट नसून भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. नियमित करभरणा करून आपण राष्ट्र विकासाला चालना देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. दुर्गादास चौधरी यांनी केले. येथील महात्मा गांधी महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाद्वारे आयोजित भारतीय करप्रणाली या विषयावरील व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. डॉ. चौधरी यांनी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या प्राचीन, शिवकालीन व आधुनिक करप्रणालीवरील पोस्टर्सची पाहणी करून त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार होते. आपल्या भाषणात त्यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना भविष्यातील नवनवीन संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले.व्यासपीठावर डॉ. विशाल स्वामी, डॉ. यादव सूर्यवंशी, डॉ. राजेश्री जाधव यांची उपस्थिती होती.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE 3rd Call**

The Superintending Engineer (Parli Circle) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr. No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Conversion of SSN to DSN & STN to DTN for lines crossing NH,SH, River, roads of 220kV / 132kV at EHV Lines under EHV O&M Division, Latur. | SE/EHVC/PV/TS/ 2025-26/T-16 | 7000038977 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:** The Executive Engineer(O): Phone No. (02446)222076.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Parli-V**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-Tender Notice**

The Executive Engineer, MSEDCL, UDGIR Division on behalf of MSEDCL (The Employer) invites sealed e-tenders from reputed & e-registered agencies/bidders for following various work. The details are as given below.

| Sr. No. | Tender No | Nature of Work | Work Area | Tender Estimate Cost (lakh) | Tender Purchase Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1. | T-29 2025-26 | Work contract for Transportation of Power T/F including loading/unloading (Annual contract) from site to site, site to repair agencies and vice versa under Udgir Division area | All Sub-Division under Udgir Division | 20 | 2360 |
| 2. | T-30 2025-26 | Short e-Tender for Annual Maintenance of Office Computers & Printers and up gradation of office Computer, printer in all Unit Offices, under Division office, Sub-Division Udgir U, Udgir R and Devani Offices under Udgir Division | All Sub-Division under Udgir Division | 2.5 | 590 |
| 3. | T-31 2025-26 | Short e-Tender for Annual Maintenance of Office Computers & Printers and up gradation of office Computer, printer in all Unit Offices, under Shirur T, Chakur, Ahemadpur and Jalkot Sub-Division Offices under Udgir Division | All Sub-Division under Udgir Division | 2.5 | 590 |
| 4. | T-32 2025-26 | Work Contract for Repairing and Maintenance work of 11 KV AB Switches & DO fuses at site and allied works by providing & fixing required material/spares in all Subdivisions under Udgir Division | All Sub-Division under Udgir Division | 10 | 1180 |
| 5. | T-33 2025-26 | "Work contract for work of Repair/Reconditioning Crimping of 11 KV HT Line jumpers at cut point machine under Udgir Division (As per MSEDCL specification)" | All Sub-Division under Udgir Division | 10 | 1180 |

The tenders will be processed only in electronics tendering mode & opened for registered agencies on e-tendering system for works contract of MSEDCL. The Bid documents will be available from **Dt.27.02.026 to Dt.06.03.2026 up to 17:00 Hrs.** The last date of uploading of e-tenders is **Dt. 08.03.2026 up to 17:00 Hrs.** For more details regarding registration process & tender visit our company's E-tendering website: **https://etender.mahadiscom.in/eatApp/.**
The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reason thereof.
**Contact Details:** S.C.Inamdar (Add. Exe. Engg.) **Contact No.:** 7875762136.

**PRO LTR No.: 039/Dt.25.02.2026**

Sd/-
**Executive Engineer**
**MSEDCL, O&M Division, Udgir**

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६